शनिवार । २८ सप्टेंबर १९७४
एक रुपया

# माणूस

## स. न. वि. वि.

सलामी योजना ७१ मध्ये जाहीर झाली. ७२ मध्ये या योजनेतील दहा पुस्तकांचे वाटप पूर्ण झाले.

रुपया पुस्तक योजनेतील आणखी दहा पुस्तकांचे वाटपही नुकतेच संपले.

वीज टंचाई, कागद टंचाई व प्रचंड भाववाढ यामुळे जाहीर केलेल्या मुदतीपेक्षा योजना पूर्ण होण्यास थोडा वेळ लागला हे खरे. पण परिस्थिती एवढी अनपेक्षितरीत्या बिकट झाली असतानाही राजहंस प्रकाशनाकडून कबूल केलेल्या सवलतीत ग्राहकांना ही सर्व वीस पुस्तके दिली गेली, याचे निदान आम्हाला तरी जरूर समाधान आहे. आता फक्त सावरकर-सुभाष योजनेतील 'मी नेताजींना बघितलंय' हे पुस्तक बाकी आहे. कागदाची सोय झाली की याही जबाबदारीतून लवकर मोकळे होण्याचा विचार सध्या जोरात चालू आहे.

पुढे काय ? कागदाची भीषण भाववाढ, टंचाई यामुळे सगळा प्रकाशन व्यवसायच आज संकटात सापडला आहे. काम नाही म्हणून पुण्यातील दोन-तीन मोठे छापखाने बंद पडलेले आहेत; चालू आहेत त्यातील कामगार-नोकरांनाही सक्तीच्या बेकारीला अधूनमधून तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत नवीन साहित्य प्रकाशित होणार कसे ? करणार कोण ? पक्की कोंडी झाली आहे या व्यवसायाची. निदान 'राजा शिवछत्रपती' या ग्रंथापासून तो 'टॉलस्टॉय-एक माणूस' या ग्रंथापर्यंत अनेक उत्तमोत्तम ग्रंथ व लहानमोठी दर्जेदार पुस्तके प्रकाशित करणाऱ्या राजहंस प्रकाशनासारख्या आमच्या छोटया संस्थेची तरी! बडयांचे आपल्याला काही माहीत नाही.

यातून बाहेर पडण्यासाठी तुमची मदत आता घेतल्याशिवाय आणि तुम्ही ती दिल्याशिवाय गत्यंतरच उरलेले नाही. सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी कुटुंबाने आता दरमहा दहा-वीस रुपये पुस्तक खरेदीसाठी बाजूला काढून ठेवले, मराठी पुस्तकांच्या आवृत्त्या मोठ्या प्रमाणात निघू लागल्या तरच हा प्रकाशन व्यवसाय या अवघड काळातून तरून जाईल. कारण लहान आवृत्ती म्हणजे भरमसाट किंमत व व्यवसायाचा आणखीनच संकोच. म्हणून मोठ्या आवृत्त्यांचे प्रयोग हाच चालू कोंडी फोडण्याचा सरळ मार्ग आहे असे आम्हाला वाटते व या दृष्टीने एक धाडसी योजना आम्ही आपल्या सर्वांसमोर ठेवीत आहोत.

राजहंस प्रकाशन दिवाळी (७४) ते दिवाळी (७५) या एका वर्षात आपल्याकडून सुमारे शंभर ते सव्वाशे रुपयांची अपेक्षा बाळगून आहे. दरमहा साधारणतः आठ-दहा रुपये हे प्रमाण. पुस्तक मोठे असेल, किंमत जास्त असेल तर एखाद दुसरा महिना मध्ये खंड राहील. पण कुठल्याही स्थितीत वर्षाला सव्वाशे रुपयांपेक्षा अधिक बोजा आपल्यावर पडणार नाही.


हे शंभर–सव्वाशे रुपयेही एकदम द्यावे लागणार नाहीत. किंवा पुस्तक प्रकाशित होण्याअगोदरही रक्कम पाठवायची नाही. पुस्तक प्रकाशित होईल; खास या मोठ्या आवृत्तीसाठी ठरवलेल्या अल्प किंमतीतच आपल्याला मिळेल. ही खास किंमत + पाठवणी-टपाल इत्यादी प्रीत्यर्थ सरसकट तूर्त एक रुपया एवढ्या रकमेची व्ही. पी. आपल्या घरी येईल, तेव्हा ती फक्त आपण सोडवून घ्यायची आहे.

पुस्तकांची निवड अर्थात चांगली राहील हे सांगणे नकोच. गेल्या दहा–बारा वर्षांतील आमची असंख्य पुस्तके आपल्या समोर आहेतच. पहिली दोन पुस्तके रवींद्र पिंगे यांची. (आनंदाच्या दाही दिशा, पश्चिमेचे पुत्र) नंतर सुमती देवस्थळे यांचे एक पुस्तक योजले आहे. नेताजींचे मोठे पुस्तक जमल्यास दोन किंवा चार भाग करून या योजनेत समाविष्ट करण्याचाही विचार आहे. बहुतेक पुस्तके लेखांच्या स्वरूपात माणूसमधून पूर्वी येऊन गेलेली आहेत. वाचकांनी या लिखाणाचे भरघोस स्वागतही केलेले आहे. त्यामुळे पुस्तक स्वरूपात हे लिखाण आपल्याला निश्चितच जवळ बाळगावेसे वाटेल याची खात्री वाटल्यानेच व्ही. पी. चे धाडस केले आहे–करणार आहोत. हे धाडस आमच्या अंगलट येणार नाही एवढी आपण अवश्य काळजी घ्यावी. काही पुस्तके तर समारंभात भेट म्हणून द्यायला-घ्यायलाही चांगली आहेत.

वर्षभर या योजनेचा अनुभव चांगला आला तर यातून एखादा बुक क्लब निघण्याचीही शक्यता आहे.

तरी सर्वांनी येत्या दिवाळीपूर्वी निदान दहा–वीस रुपये तरी राजहंस प्रकाशनासाठी बाजूस काढून ठेवावेत ही विनंती. ऑक्टोबरात तर आपल्याकडून अपेक्षा फक्त ६।७ रुपये एवढीच आहे. कळावे,

आपले । श्री. ग. माजगावकर । व. मो. पुरंदरे । दिलीप माजगावकर । राजहंस प्रकाशनकरिता


हवे तर थोडे वैमानिक स्मगल करून आणा !
देशात एवढ्या गोष्टी स्मगल्ड मिळतात पण स्मगल्ड खादी मिळेल तर शपथ !


खरे स्मगलर्स
नामा निराळेच!


माझं हृदय स्मगल
केलेस ना? मग लग्नाला
होकार दे !
श्या म जो शी –

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २८ सप्टेंबर | अंक : अठरावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# भोगलवाडी येथील विद्यार्थीसत्तेचा प्रयोग

भोगलवाडी या केज तालुक्यातील गावी काही तरुण विद्यार्थ्यांनी संघटना स्थापन करून विधायक कार्याला सुरुवात केली हे 'माणूस'-च्या वाचकाना ठाऊक आहेच. (पहा : भोगलवाडीची भन्नाट पोरं हा लेख माणूस : दिनांक ८ सप्टेंबर १९७३.) पुढे निवडणुकीमध्ये याच कार्यासाठी अनुकूल असणाऱ्या लोकाना पाठिंबा देऊन गावाची ग्रामपचायत आपल्याकडे आणण्यामध्ये त्यांनी यश मिळविले. पण हे विद्यार्थी एवढ्यावरच थाबले नाहीत. किंबहुना सत्ता हाती आली म्हणजे ग्रामविकासाचे एक साधन हाती आले अशा भावनेने या संघटनेने गेल्या ६–७ महिन्यात कौतुकास्पद कामगिरी केली आहे. या गावाच्या संघटनेपासून स्फूर्ती घेऊन शेजारच्या अनेक गावी विद्यार्थ्यांनी सघटना स्थापन करायला सुरुवात केली आहे. परतु गावातील प्रस्थापितवर्ग व शासनयत्रणा यांनी आणलेले अडथळे पहाता मनस्वी दुःख होते. मात्र विद्यार्थ्यांनी माघार घेतलेली नाही. त्यांनी जी काही कामे करून दाखविली आहेत ती पाहिली म्हणजे 'माणूस'चा वाचकवर्ग देखील त्यांचे कौतुक करील व गावोगावच्या इतर विद्यार्थ्यांनाही त्यापासून स्फूर्ती मिळेल.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भोगलवाडीपासून धारूरपर्यंत एस्. टी. सुरू झाली. ग्रामपचायतीमार्फत अर्ज केला. औरंगाबादला हेलपाटे घातले व गावामध्ये सभा घेऊन गावकऱ्यांना आश्वासन दिले, की आठ दिवसांच्या आत एस्. टी. सुरू करून दाखवितो. सुदैवाने धारूरचे डेपो मॅनेजर श्री. मामा किंबहुने व सेक्रेटरी श्री. पाटील हे दोघेही मदत करणारे निघाले. खरोखरीच आठ दिवसाच्या आत एस्. टी. सुरू झाली. पहिल्या दिवशी केलेल्या भाषणात या दोघांनी पुढील विचार माडले, 'तुमच्या गावाला एस्. टी. सुरू झाली आहे, तिचा तुम्ही फायदा घ्या. हे करताना या विद्यार्थ्यांनी फार मेहनत घेतली आहे. अशा प्रकारची कामे होण्यासाठी आमदार अगर मत्र्याचे पाय धरण्याची गरज नाही. तुम्ही आमच्याकडे आलात तर आम्ही आनदाने तुम्हास मदत करू. आम्ही तुमच्या सेवेसाठीच आहोत. तुम्ही गावातील लोक या सघटनेच्या पाठीशी रहा.' एस्. टी. सुरू झाल्यामुळे आजुबाजूच्या खेड्यातील लोकाचीही सोय झाली आहे. आत्तापर्यंत ग्रामपचायत होतीच की. परंतु या पोरानी सत्ता हाती येताच ४–५ महिन्यात एस्. टी. सुरू केली. म्हणून सर्वजण या पोरांना दुवा देत आहेत.

गावातील जुगारी प्रवृत्ती व हातभट्टीचा यांना पायबद घालण्यामध्ये या गावाला यश आले आहे. त्याचे प्रमाण म्हणजे काही जुगारी लोक धदा बुडाला म्हणून या पोराच्या नावाने ओरड करतात. आता पूर्वीप्रमाणे जबर व्याजाने पैसे देणे व घेणे याचे प्रमाणही कमी झाले आहे.

ग्रामविकासामध्ये विद्यार्थ्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे त्याबाबतीत काही गोष्टी सांगणे उपयुक्त ठरेल.

दोन वर्षापूर्वी अगदी प्रथम जेव्हा गावात आंबेडकर जयंती साजरी झाली त्यावेळी गावामध्ये मारामारी झाली होती. प्रकरण पुढे कोर्टात गेले होते व गावामध्ये वातावरण तग झाले होते. यावर्षी आंबेडकर जयती धूमधडाक्याने साजरी झाली. केवळ विद्यार्थीच नव्हे तर सरपंच व इतर पचही महारवाड्यामध्ये जाऊन आनदाने जेवले. सर्वांना समाधान वाटले. गावातील प्रस्थापितांना वाईट वाटले असणारच. परतु त्यानी काहीही विरोध केला नाही, मारामारी केली नाही, याबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.

आणखी एक मजेशीर गोष्ट आहे. गावामध्ये मारुतीचा सप्ताह सुरू होण्याचे दिवस जवळ आले. त्यासाठी पारावरील मारुतीच्या देवळाला रग देऊन सजवायचे होते. सघटनेमध्ये दलित विद्यार्थीही आहेत. पाराला व देवळाला रग देऊन झाला. देवळाच्या भितीवर गणपतीचे चित्र काढावयाचे होते. सघटनेचा नेता बाबू याने शकर नावाच्या दलित विद्यार्थ्याला पारावर चढून चित्र काढायला सांगितले. तो घाबरला. म्हणाला, 'झाल एवढं पुरे झालं! मी जर चित्र काढायला पारावर चढलो तर गावकरी हाणतील.'

बाबू म्हणाला, 'तस झाल तर पहिला घाव माझ्यावर पडेल. सघटनेची पोरंही पुढे येतील व मगच तुझ्यावर घाव पडेल. चल हो पुढ.'

शकर पुढे झाला. पारावर चढला. बघता बघता गणपतीचे सुदर चित्र साकार होऊ लागले. पोरग तस गुणी. हस्ताक्षर सुदर तर चित्रकला उत्तम. गावातील लोक येत. थांबत. बघत व पुढे जात. काहीही विरोध झाला नाही. जर विरोध झाला असता तर सर्व

संघटनेच्या पोरांना पढवून ठेवले होते. 'अरे ज्याच्या हातून देव साकार होतो आहे त्याला तुम्ही मंदिराचा स्पर्श नाकारणार ?'

पण तशी वेळ आलीच नाही.

गावामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई नाही. पण एक पाणवठा नव्हता. बाबूला त्याची रुखरुख होती. पण त्याने ठरविले, की गाजावाजा करायचा नाही. धरले एकदा पांडुरंग नावाच्या चांभाराच्या पोराला हाताला व लावले पाणी भरायला. ते पोरग करकुर लागले. मग त्याला सांगितले, तू घाबरू नकोस. मी आहे. पोराने पाणी भरले. लोकानी पाहिले. काही झाले नाही. हळूहळू आता एक पाणवठ्याच्या रोखाने प्रगती सुरू आहे. विरोध दुबळा होतो आहे.

गावातील शाळा प्रसिद्ध होती, पोरांचा निकाल लावण्याबाबत. शिक्षक तरबेज होते दारू पिऊन धिंगाणा घालण्याबाबत व पोरांकडून तवाखू-चुना घेण्याबाबत. संघटनेने अधिकाऱ्याकडे अर्ज करून चार शिक्षकांच्या बदल्या केल्या. त्यातील तीन शिक्षक गावातीलच होते. त्यानी खूप आरडाओरड केली. एक तर सरपचाचा जवळचा नातेवाईक. पण इलाज नाही. बदल्या झाल्या. बदल्या झालेल्या शिक्षकांचे कुटुंबीय संघटनेला दुवा देत आहेत. कारण आता दारूपायी, जुगारापायी पैसे जाणार नाहीत. गोखले म्हणून कोणी अनुभवी हेडमास्तर आले आहेत. शाळेमध्ये आता शिस्त आली आहे. पोरे येतात, कवायती देखील होतात. आपल्या गावामध्ये शाळा आहे असे गावालाही आता वाटायला लागले आहे. शाळेमध्ये विद्यार्थिनी जास्त आणण्याचा विचार पोराचा आहे. गोखल्यांच्याबद्दल मात्र एक अपूप गोष्ट सांगतात. म्हणे रजेची चिठ्ठी दिल्याशिवाय ते रजेवर जात नाहीत. असे असेल तर चागलेच आहे. त्यानी रात्रीचे वर्ग सुरू केले आहेत. इतर शिक्षकांनाही ते आवडले. ते मनापासून त्यांना साथ देतात.

नवीन आलेला सरपंच स्वभावाने शात पण मनाचा खबीर आहे. त्याचा निवडणुकीसाठी काही खर्च झाला. जुने प्रस्थापित म्हणू लागले आम्ही लक्ष ठेवून आहोत बर का ? तू कोठे पैसे खातोस ते बघणार आहोत. सरपचाने उत्तर दिले–'मी पैसे खायला सरपंच झालोच नाही. तुम्ही खुशाल लक्ष ठेवा. अगदी डोळयात तेल घालून.'

बिचाऱ्याची घरची परिस्थिती चांगली नाही. २०–२५ माणसांचे मोठे कुटुब आहे. त्याने परवा अक्षरशः बरबडयाचे पोते घेतले. हो ! खायला. मनामध्ये विचार आला खरच बरबडा खाणारे किती बरे सरपंच असतील ? भोगलवाडीचा सरपंच मात्र आहे.

ग्रामपंचायत आपल्या हातातून गेल्यामुळे गावातील मूठभर प्रस्थापित वर्ग फारच अस्वस्थ झाला आहे त्याचे वरपर्यंत धागेदोरे असावेत असा तर्क आहे. त्यामुळे काही तरी निमित्त काढून व कोणाला तरी पुढे करून सघटनेला बदनाम करण्याचे व निरुत्साही करण्याचे प्रयत्न सतत चालू असतात. त्यापैकीच एक भाग म्हणजे मधून-मधून होणाऱ्या मारामाऱ्या. गेल्या ५–६ महिन्यात ३–४ वेळा मारामाऱ्या झाल्या आहेत. गावातील लोक सघटनेवर प्रेम करतात. परतु मारामाऱ्या होतात त्यावेळी लोक जमा होईपर्यंत मारणारे पळून जातात, त्याबाबतीत सध्या खटलाही चालू आहे. धारूर येथील फौजदारांनी लक्ष घालून खरे असतील त्यांना निर्भीडपणे सरक्षण द्यावे अशी सघटनेतील विद्यार्थ्यांची मागणी आहे.

भोगलवाडी येथे जो ग्रामसेवक आहे तो आज १५ वर्षे त्याच गावामध्ये आहे. ग्रामपचायत नवीन लोकाकडे गेल्याचे त्यालाही आवडले नाही. यामुळे निर्णयाची अमलबजावणी नीट होत नाही असा संघटनेचा अनुभव याहे. म्हणून त्या ग्रामसेवकाची बदली व्हावी यासाठी सनदशीर मार्गाने सध्या सघटना प्रयत्नशील आहे.

वास्तविक 'एक गाव-एक पाणवठा' हा कार्यक्रम शासनाने मान्य केला आहे. त्याचे निरनिराळ्या गावी प्रयोग सुरू झाले आहेत. अशा परिस्थितीत भोगलवाडीच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले पाहिजे. त्याना उत्साह येईल, सरक्षण मिळेल असे काही तरी केले पाहिजे म्हणूनच धारूर येथील फौजदार यांचेकडून विद्यार्थ्यांच्या फार अपेक्षा आहेत. कोणतेही निमित्त काढून ज्या मारामाऱ्या होतात त्या होऊ नयेत, कायद्याचे राज्य (गुडाचे नव्हे) भोगलवाडीमधे प्रस्थापित व्हावे यासाठी प्रयत्न करावेत अशी विद्यार्थ्यांची इच्छा आहे.

भोगलवाडीसारखी अनत गावे या देशात असतील. परंतु या गावात जिद्दीने उभी राहिलेली पोरे पाहिली म्हणजे निराश मनाला आशेचा किरण दिसू लागतो. परतु त्यानी सुचविलेली विधायक कामे शासनयंत्रणेकडून सहानुभूतीने विचार करून जर होतील तर त्याचे काम सुकर होईल. या संघटनेच्या यशामुळे आजुबाजूला ज्या सघटना उभ्या रहात आहेत त्याना आत्मविश्वास व उत्साह येईल. या बाबतीत भोगलवाडी शेजारच्या चोडी या गावचा उल्लेख करता येईल.

–प्रा. सु. रा. काकडे


# श्रीग्रामायन

प्रसिद्ध झाले — पंधरा रुपये | लेखक श्री. ग. माजगावकर | राजहंस प्रकाशन पुणे ३०

# गौतम बुद्धाला जेथे साक्षात्कार झाला!

## निळू दामले

### भटकंती : तीन

सकाळी ८ च्या गाडीने ५ तारखेला पोचलो बक्सरला.

गाव अत्यत गचाळ. रस्ता नावाची चीजच नाही. सगळे खाच-खळगेच. रस्त्यावर खर्च केल्याची नोद बिहार सरकारच्या कागदो-पत्री वर्षानुवर्षे होतेच आहे. पैसे आणि सामुग्री पुढाऱ्यांच्या खिशात. रस्ते झालेच नाहीत.

बिहारात प्रशासन वगैरे नाहीच. म्हणजे एक प्रचंड गोंधळच आहे. महाराष्ट्रासारखी एस. टी. ची सोय नाही. खासगी व्यवस्था थोडीफार आहे. ते लोक हवी तेव्हा, हवी तशी, हवी तेथे बस सोडतात. बस म्हणजे प्रचड गोघळच. एक वॅगनच. दोनशे माणसे खचाखचा भरली जातात. बसला घंटीही नाही. 'होऽऽऽ' असा आवाज केला की बस सुरू. 'होऽऽऽहुप' असा आवाज केला की बस थांबायची. आपल्याकडे गाई, म्हशी हाकताना जसे आवाज काढतात तोच प्रकार. कडक्टर ही म्हैस हाकीत असतो. बस केव्हा बद पडेल सांगता येत नाही. एकदर प्रकार अजबच

बक्सरचे हॉस्पिटल अत्यत गचाळ. उकीरडाच म्हणा ना! हॉस्पिटलच्या दारातच घाणीचा आणि कचऱ्याचा प्रचंड ढीग. दुर्गंधी सुटलेली. कित्येक वर्षे म्हणजे हॉस्पिटल बाधल्यापासून घाण आणि हॉस्पिटलची जोडी आहे. आधी खराब रस्त्यावरून रिक्षातून येता येताच रोगी बेजार होतो. हॉस्पिटलमध्ये त्याला लवकरच 'मुक्ती' मिळते या घाणीमुळे. लोकाना घाणीची सवय आहे आणि तक्रार करत बसायचीही सवय आहे. तक्रार दूर होत नाही हे सहन करायचीही सवय आहे.

शेतकऱ्यांना बी बियाणे मिळत नाहीत. सरकारी दुकानातून पाठच्या दाराने बियाणे व खते सरळ व्यापाऱ्याच्या गोदामाचा रस्ता धरतात. शेतकऱ्याला या 'नवीन' दुकानातच मग खते उपलब्ध होतात. किंमत दुप्पट होऊन गेलेली असते. शेतकी खात्याचे कर्मचारी, पोलीस याचे हप्ते, अधिक वाहतूक खर्च, अधिक व्यापाऱ्याचा फायदा एवढ्यामुळे किंमत दुप्पट होणार हे उघडच आहे. बावळट लोक यालाच काळाबाजार असे म्हणतात. ते मूर्ख आहेत. बिहार सरकार असेच चालते याची त्यांना कल्पना नाही. एक अधिकारी आहे. प्रथम १० रुपये लाच मागतो. वाटाघाटीत २ रुपयापर्यंतही येऊन पोचतो. एखाद्याने ताणूनच धरले तर चार मिनार सिगारेटचे एक पाकीट आणि काड्याची पेटी एवढ्यावरही काम करून टाकतो.

कोर्टाला इमार नाही. पाऊस पडायला लागला की कोर्टाचे काम बंद! वकील लोक झाडाखाली बसूनच आपले काम करतात.

असे हे बक्सर.

१६ मार्चलाच येथे छात्र सघर्ष समितीची स्थापना झाली. १८ मार्चच्या विधानसभेवरील निदर्शनासाठी २००–३०० विद्यार्थी पाटण्याला पोचले होते. तेव्हापासून आतापर्यंत छात्र सघर्ष समितीने दिलेले सर्व कार्यक्रम इथे पार पाडले जात आहेत. कॉलेजे बद आहेत. इथल्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची सख्या २ हजाराच्या आसपास आहे.

१५ ऑगस्टला जनतेचे वेगळे झेंडावंदन करावयाचे ठरले होते. भ्रष्ट अधिकाऱ्यांचे हात लागावयाचे, त्याऐवजी एका भगिणीच्या हाताने ध्वजारोपण करण्याचा निर्णय झाला होता.

गावात १–२ कम्युनिस्ट आहेत. त्यानी आपल्या काँग्रेसी साक्षीदारांसह तहसीलदाराची भेट घेतली. आणि हे लोक काळा झेंडा फडकवणार आहेत असे सांगितले. देशप्रेमाने भारलेल्या पोलीस अधिकाऱ्याला सहन झाले नाही.

१५ ऑगस्टला सकाळी पोलीस चौकी समोर झेंड्याची काठी रोवण्यासाठी गेलेल्या एका माणसाला पकडून नेण्यात आले. गावात वातावरण तग बनले. सकाळी ९ च्या सुमारास या ३० हजाराच्या आसपास वस्ती असलेल्या गावतील ५–६ हजार लोक चौकात झेंडावदनासाठी जमले. भगिणीने झेंडा फडकवला. आणि तावडतोब लाठी माराला सुरुवात झाली. कारण काय? काहीच नाही. कदाचित सरकारी झेंडावदनाला कोणीच नाही ही चीड असावी.

लोकांना खूप मारण्यात आले. घराघरात जाऊन स्त्रिया व मुले याचीही कणीक तिंबण्यात आली. रस्त्यावर चपला शिवीत असलेल्या मोच्याचे हाल झाले. धावपळ कसली म्हणून तो चौकशी करू लागला आणि असेल काही तरी म्हणून सामानाची आवराआवर करीत असतानाच लाठ्या बसू लागल्या. बिचारा जबर जखमी झाला.

मुलीच्या सरकारी शाळेत कारकुनी करणाऱ्या एका युवकाला खूप लाठ्या बसल्या. हॉस्पिटलमध्ये पोचवीपर्यंत तो बिचारा सपलाही.

घरात घुसून भांडीकुडी फेकण्यात आली. मौल्यवान चीजवस्तू लुटण्यात आल्या.

'कृपया हा सर्व प्रकार थाबवा' म्हणून सागायला गेलेल्या वकिलाच्या शिष्टमंडळालाही खरपूस चोप देण्यात आला.

पोलीस ठाण्यासमोरच्या एका इमारतीत मुलींचा शिवणाचा वर्ग चालतो. मुलींनी हा प्रकार पाहिला. त्या इतक्या चिडल्या की हातात

येईल त्या वस्तू त्यांनी दुसऱ्या मजल्यावरून फेकून मारून पोलिसांना हैराण केले.

चळवळीपासून थोडेफार दूर असलेली वकील–प्राध्यापक–डॉक्टर मंडळी आता मात्र रागावली. १५ ऑगस्टनतर जनसघर्ष समिती जास्त जोमाने कार्य करू लागली.

८ × ८ च्या एका खोलीत २४ जणांना ३१ तासपर्यंत अडकवून ठेवण्यात आले होते. अन्नपाणी नाही. मलमूत्र विसर्जनाचे कार्यक्रम त्याच खोलीत.

अडकवून ठेवण्यात आलेल्यात मोठ्या प्रमाणावर वकील आहेत.

आता मात्र ते बोबलू लागले आहेत की या देशात कायदाच शिल्लक नाही.

गावात चीड आहे आणि भीतीही आहे, पोलिसाच्या अत्याचारांची.

जवळच्याच सिमरी गावच्या एका माणसाला जेलमध्ये भेटायला गेलो. हा बरमेशरजी तालुका पचायत समितीचा माजी सभापती. ६० वर्षांचा माणूस. पण खूप धिप्पाड १२ ऑगस्टपासून त्याला दरोडेखोरी, दंगा, लुटालूट वगैरे कलमाखाली अडकवून ठेवण्यात आले आहे. सिमरीतल्या १५ ऑगस्टच्या कार्यक्रमाचे आयोजन त्याने केले हाच त्याचा गुन्हा. सोडण्याचा हुकूम मिळायचा आणि हा माणूस बाहेर पडायची तयारी करीत असताना आणखी कुठल्या तरी कलमाखाली पुन्हा त्याला अडकवून ठेवण्याचा हुकूम वरून मिळायचा. ६ तारखेला तो सुटणार होता. तसे कागदपत्रही तयार झाले होते. सध्याकाळी ४ वाजता सोडणार असे मला जेलरने सांगितले.

दुसऱ्या दिवशी पहातो तर हा माणूस अजून जेलमध्येच. महिनाभर हाच प्रकार चालला होता.

जेलमध्ये कैद्याचे रेशन वगैरे कसे जेल अधिकारी चोरतात याच्या कथा सांगत होता. महिन्याला किमान २।३ हजार रुपयांची अफरातफर होते असे तो सांगत होता.

जेलच्या दारातच गांधीजीचा फोटो आहे. सत्याबद्दलचे गांधीजीचे विचार चारी भिंतीवर लिहिलेले होते. त्यातल्या एका फोटोखाली जेलर बसला होता.

मुख्य दाराबाहेर एक शिपाई बंदूक घेऊन उभा होता.

त्याच्या पायातले बूट फाटके होते आणि पायाची बोटे बाहेर डोकावत होती.

'का बाबा ही अवस्था ?' मी विचारले.

'क्या बताऊ ! यही है हमारा हाल. किसकी तरफ हम देखें ?' त्याचे उत्तर.

७ तारखेला सिमरी येथे जाण्यासाठी निघालो. सुमारे १७ मैलाचे अंतर बक्सरपासून. रस्ता नाहीच. त्यातून पूर आलेला. त्यामुळे चालेल तेवढा वेळ सायकल. मग सायकल खांद्यावर घेऊन काही अतर. मग काही अंतर सायकल हातात घेऊन चालतच रखडत पार पाडायचे असा प्रवास. एक दोनदा चिखलात आपटी खावी लागली. या लोकाचे कायम कसे हाल चाललेले असतात ते अनुभवत अतर काटले.

चिखलाने माखलेल्या अवतारात सिमरीत पोचलो. १०हजाराच्या आतच वस्ती.

गावात कमालीचा भ्रष्टाचार. शेतकऱ्यांना सर्व आवश्यक वस्तू काळ्या बाजारातच खरेदी कराव्या लागतात.

इथली पोरे मात्र भन्नाट आहेत. कोणीही प्रमुख नेता या गावात पोचला नसतानाही छात्र संघर्ष समितीची शाखा स्थापन झाली. त्याच्या दबावामुळे जनसघर्ष समितीत सर्व शेतकरीच आहेत. छात्र सघर्ष

□ □ □ □ □

**JOSHI TRADING Co. ( Pvt. ) LTD.**

Baldoda House,
Church Gate,
BOMBAY

□ □ □

समितीत सर्व शाळकरी पोरेच. कारण गावात कॉलेज नाही. कॉलेजाच्या दुसऱ्या वर्षापर्यंत पोचलेली २–३ पोरे नेतृत्त्व करीत आहेत. दिवसात आसपासच्या तीन गावात सायकलने किंवा पायी जाऊन भेट देताहेत. समित्या स्थापन करताहेत. कार्यक्रम पार पाडून घेताहेत. माकडांच्या टोळीसारखे काम चालू आहे.

पैशाचे, नेतृत्वाचे आमिष दाखवून पोरांना फोडण्याचा प्रयत्न कॉंग्रेसवाल्यांनी अनेकदा केला. पण पोरांनी दाद दिली नाही.

सर्व पोरे शेतकऱ्यांची आहेत. सर्व शेतकरी छोटे शेतकरी आहेत. मराठवाड्यातल्या शेतीसारखीच इथल्या शेतीची अवस्था आहे. १० वर्षात ७ वर्षे पूर, एक वर्ष अती पाऊस, एक वर्ष पाऊसच नाही. आणि उरल्या वर्षात जेमतेम ८ आणे पीक यायचे अशी अवस्था.

१२ ऑगस्टला सिमरीला पोलिसानी विनाकारण लाठीमार केला. बायका मुलाना खूप बदडले.

छात्र संघर्ष समितीने सरकारवर सामाजिक बहिष्कार सुरू केला. **कोणाही सरकारी अधिकाऱ्याला वाणी धान्य देत नाही, न्हावी दाढी करीत नाही, व धोबी कपडा धूत नाही. गावातल्या हॉटेलात त्याला चहाही मिळत नाही. अजूनही सामाजिक बहिष्कार चालू आहे. बक्सरहून किंवा आरा या जिल्ह्याच्या ठिकाणाहून ट्रॅक्टरवर लादून सर्व वस्तू या सरकारी लोकांना आणाव्या लागतात. काड्यापेटीपासून तर पाण्यापर्यंत.**

सिमरीहून परत येत असताना एक माणूस बऱ्यापैकी कपड्यातला सायकलवरून येत होता. आमच्याकडे पाहून हसला आणि काहीतरी बोलायचा प्रयत्न करू लागला. माझ्या बरोबरच्या विद्यार्थ्यांपैकी कोणीही थांबलाच नाही. पुढे गेल्यावर मी चौकशी केल्यावर एकाने सांगितले 'साला सरकारका दलाल है' गावातल्या कोणीही चोरीछिपी सरकारशी सहकार्य केले, एखादी वस्तू सरकारी माणसाला दिली तर त्याही माणसावर सामाजिक बहिष्कार होतो. मगाचचा माणूस त्यापैकीच होता. एका तहसीलदाराला या माणसाने रात्री ११ नतर गपचूप तांदूळ नेऊन दिला होता.

आता शिक्षा भोगतो आहे. गयावया करतो आहे. पण कोणीच ऐकत नाही. तो आता समाजबाह्य झाला आहे.

७ ला रात्री पोराबरोबर २॥ मैलावर असलेल्या नगवा या गावात गेलो.

गावाची लोकसख्या सातशेच्या आसपास. ७० उंबरठयाचे गाव.

पोरे गावात पोचल्यावर भराभर माणसे जमली ५० च्या घरात. बैठक सुरू झाली.

२ ऑक्टोबर नतर बिहारबद कसा करायचा याची चर्चा झाली. सघर्ष समितीचे निर्णय वाचून दाखवण्यात आले. पैशाचा हिशोब झाला. आजच सकाळी जहानाबाद येथे जगदेव प्रसाद या माजी मत्र्याला निदर्शन करताना गोळ्या घालून ठार मारण्यात आल्याची बातमी पोचली होती. शोक प्रकट करण्यात आला. या खुनाचा बदला घेऊच अशी प्रतिज्ञा झाली.

या गावात शेतमजूर-भूमिहीनाची सख्या जास्त आहे. दिवसाला जेमतेम दीड रुपया मजूरी मिळते. एक रुपया संघर्ष समितीला देण्याचे शेतमजुरानी जाहीर केले.

गावातला एक वृद्ध माणूस शामबाबू बोलत होता. 'गफूरला हटवून, इंदिरेला हटवून प्रश्न सुटणार नाहीत. आपल्याला संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलायची आहे. त्यासाठी दीर्घकाल संघर्ष चालवावा लागणार आहे. म्हणून हिंमतीने कबर कसा. तरुण पोरे मन लावून ऐकत होती. पुगी ऐकताना नाग जसा डोलावा तशी डोलत होती.

आज नव्हे, १८ मार्चपासून हे चालत आले आहे.

रात्री ११ वाजता ही बैठक संपवून दुसऱ्या बैठकीसाठी–अडीच मैलावरची आणखी एक छोटी वस्ती–रवाना झालो.

आपणही या नवसमाज निर्मितीच्या प्रयोगात स्वतःला झोकून द्यावे असे वाटत होते. धुंदी चढत होती.

–आणि मग रामगढ़. हेही छोटे गाव. इथेही सामाजिक बहिष्कार चालू आहे गेला महिनाभर. शांतपणे. इथेही पोलिसानी मनसोक्त लाठी फिरवली आहे.

इथल्या आमदाराने राजीनामा दिल्यावर इथे एप्रिल-मेमध्ये पोट निवडणूक होणार होती.

निवडणुकीचा अर्जही कोणी भरला नाही. कशी होणार मग निवडणूक ?

शामबाबू रस्ता दाखवायला रात्री आले होते. '७१ च्या सुमारास इदिराच्या विरोधात कोणी बोलले तर मार खावा लागत होता. आज इदिराच्या बाजूने बोलणाऱ्याला मार खावा लागतो आहे.'

म्हातारा ४२ सालच्या कथा सागत होता. ८ तारखेला आदिवासी भागात जायचय !


# भटकंती : चार

बक्सरहून डाल्टन गंजला पोचणे म्हणजे दिव्यच. बक्सरहून मोगल सरायला जायचे. मोगल सरायहून गाडी बदलून देहरी ओन सोनला रात्री १२ वाजता सुटणारी गाडी पकडून डाल्टन गजला पोचायचे.

देहरी ओन सोनला भूक लागली म्हणून काही खायला मिळते काय हे पहात सामान बसायच्या जागेवर सोडून हिंडत होतो. १९–२० मिनिटांनी परत आलो. बाजूच्या माणसाने विचारले, 'तुम्ही बिहारमधले दिसत नाही.' 'तुम्ही कशावरून ओळखलेत' –मी. तो म्हणाला की या स्टेशनवर कोणीच सामानापासून दूर जात नाही. इथे नेहेमी चोऱ्या माऱ्या होतात. दरोडेखोरीही याच लाईनवर मोठ्या प्रमाणावर चालते. माझे सामान चोरीला गेले नाही हे नशीबच म्हणायचे. पुन्हा कधीही असे करू नये असा सल्ला त्याने मला दिला. आसपासचे लोकही मी मूर्ख आणि बावळट आहे अशा आविर्भावात माझ्याकडे पहात होते.

सकाळी ६ वाजता डाल्टन गंजला पोचलो. डाल्टन गज हे पलामू ह्या जिल्ह्याचे मुख्य शहर राजधानी. छोटा नागपूर या आदिवासी ६ जिल्ह्याच्या विभागापैकी पलामू हा एक जिल्हा. १५ लाख लोक-

पृष्ठ २६ वर




**दैवगती पहा !
उद्योगक्षेत्रात
आम्ही दोघांनी
एकदमच
पदार्पण केले होते...**

पण दोघांत अरूण सूज्ञ होता.
त्याने वेळीच बँक ऑफ इंडियाची
मदत घेतली. उदार अटींवर
मिळणारे आर्थिक सहाय्य व
योग्य मार्गदर्शन यासाठी आता तो
बँक ऑफ इंडियाचे आभार मानतो.
कारण यामुळेच अरूणचा स्वतंत्र
लघुउद्योग आता भरभराटीला आला आहे.
विचारा प्रताप मात्र फार मागे पडला.

लघुउद्योगांना बँक ऑफ इंडिया मोठ्या प्रमाणात
आणि उदार अटींवर आर्थिक सहाय्य देते जसे:

■ जागा, जमीन, इमारत, प्लान्ट, मशीनरी यांसारखी
स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी कर्ज —

■ कच्चा माल, वापरातील माल, पुर्जे,
तयार होत असलेला माल, तयार माल, बाजारातील येणे
यासारख्या तारणावर खेळते भांडवल कर्जाऊ देणे —

■ निर्यात व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी
खास आर्थिक सहाय्य देणे —

आघाडीवर राहण्यासाठी—
बँक ऑफ इंडिया

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/CB/007 MAR

# सोलकढी

## □ २०व्या शतकातले एकनाथ

शिक्षण ही, पशूचा माणूस आणि माणसाचा नागरिक बनविणारी एक दिव्योदात्त गोष्ट आहे, हे आम्हा भारतीयानः जितके कळलेले आहे तितके इतरांना कळलेले असेल असे वाटत नाही. त्यामुळे देशातल्या शिक्षण-व्यवस्थेकडे आणि शैक्षणिक वातावरणाकडे आपले सारखे व बारीक लक्ष असते. शिक्षण-पद्धतीत आपण आपले पुन्हा पुन सुधारणा करत असतो. एक इग्रजी भाषा घेतली तरी स्वातत्र्योत्तर काळात ती प्रभावी रीतीने शिकवण्याच्या किती अद्भूत पद्धती आपण शोधून काढल्या हे पाहिले म्हणजे कौतुकाने मन कसे भरूभरून येते. त्यामुळे एक ऊट-पटाग विरोध येथे पैदा झाला आहे : आपला देश मागासलेला आहे; पण आपले शिक्षण कमालीचे पुढारलेले आहे !

म्हणजे ते परिपूर्ण आहे असे नव्हे. शिक्षण कधीच परिपूर्ण असत नाही; परिपूर्ण होते ते खरे शिक्षणच नव्हे. (व्वा ! व्वा !!) आपल्याला हे चागले ठाऊक आहे. त्यामुळे शिक्षण, शिक्षणपद्धती, शिक्षकवर्ग, शिक्षण-प्रतिपालक अधिकारी, शिक्षणसस्था याच्या-वर, आवश्यक वाटेल तेव्हा, कडकडीत टीका करण्याची एक आततायी परपरा येथे रुजून राहिली आहे त्यात खऱ्या आणि जिवत लोकशाहीमुळे, आपल्याकडच्या वृत्तपत्राना अनिर्बंध स्वातत्र्य मिळाले आहे. म्हणून काही वृत्तपत्रे शैक्षणिक प्रदूषणाबद्दल हाकाटी करण्यात कशी रगून गेलेली असतात.

उदाहरणार्थ, आमचे ' महाराष्ट्र टाईम्स. ' महाराष्ट्रातल्या शिक्षणक्षेत्रातला भ्रष्टाचार निखदून येथे आनदवनभुवन निर्माण करा-यचा त्याने जणु विडाच उचललेला दिसतो. मुबई पुणे नागपूर कोल्हापूर टिळकमहाराष्ट्रविद्यापीठातल्या सुरस आणि चमत्कारिक गैरप्रकाराबद्दल ' महाराष्ट्र टाईम्स 'ने वेळो-वेळी खास लेख व खास अग्रलेख लिहिले. त्यामुळे झाले एवढेच की इथूनतिथून सगळी विद्यापीठे सारखीच आहेत हे आमच्या लक्षात येऊन प्रत्येकाचा स्वकष्टार्जित दुर्लौ-किक पुष्कळच कमी झाला. शिवाय, शिक्षणासारख्या पवित्र व राष्ट्रोद्धारक क्षेत्रात असे व्हायचेच; किंबहुना असे काही झाल्या-नेच शिक्षणाचे मूलभूत पावित्र्य अबाधित राहाते, अशी समजुत आम्ही वाचकांनी करून घेतली. विद्यापीठातल्या सबधित अधिकाऱ्यानी व सबधित कुलगुरू-कुलपतीनी हे लेख वाचले असतील असा सभव नाही. वर्तमानपत्री टीका वाचायचे त्यानी ठरवले तर त्याना दुसरे काहीच करता येणार नाही. एकूण महाराष्ट्र राज्यात शिक्षणाचे भात-पिठले चागले जमले होते. सगळेजण ते मिटक्या मारत ओरपत होते.

परवा मात्र अचानक एक ठसका लागला. मराठवाडा विद्यापीठ चौकशी समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला . त्यात, मराठवाडा विद्यापीठात घडलेल्या एकानेक रगीबेरगी गैरप्रकाराचा चट्टकमट्टक वृत्तात सादर केला आहे. अहवालात जागोजागी नावे, आकडे, तारखा असल्यामुळे माझ्यासारख्या अनेक वाचकाचा त्यावर विश्वास बसेल, अशी मला भीती वाटते आत्तापर्यंत वर्तमानपत्रा-तल्या टीकेकडे मी वर्तमानपत्रातली (तर) टीका म्हणूनच पाहात होतो. तिच्यात दहा ग्रॅम माल आणि नव्वद ग्रॅम मसाला असणार अशी माझी समजूत. त्यात पुन्हा, रामशास्त्री प्रभुण्याच्या महाराष्ट्रभूमीत जन्म घेतल्यामुळे माझी न्यायबुद्धी अत्यत प्रखर : त्यामुळे ' महाराष्ट्र टाईम्स ने' म्हटले म्हणून आपटे महाजनी गजेंद्रगडकर टोपे चिदबरम् चौधरी नामजोशी पवार इथापे नाथ प्रभृती व्यक्ती अपराधी आहेत असे मी कधीच मानले नाही. उलट ' महाराष्ट्र टाईम्स 'ने म्हटले म्हणून त्या व्यक्ती अप-राधी नाहीत, असेच मी मानले.

आता तसे मानणे अमळ अवघड होणार आहे. कारण मराठवाडा विद्यापीठ चौकशी समिती, मुळात, ' महाराष्ट्र टाईम्स 'ने ९ व १० जानेवारी ११७४ रोजी लिहिलेल्या ' नाथाचे भारुड ' या दोन लेखातल्या आरोपाची शहानिशा करण्यासाठी नेमली गेली होती. या लेखातून, गलथान कारभार, नियमबाह्य वर्तन, वशिलेबाजी, उधळपट्टी, परीक्षातली दडपादडपी, असे नाही नाही ते आरोप बिचाऱ्या नाथावर करण्यात आले होते. ' नाथाळाचे काठी हाणू माथा ' अशा तुकारामी त्वेषाने गोविंदराव तळवळकरांनी हे लेख लिहिले होते. (आजकाल तळवळ-कराचे हे गोविंदराव भलत्या तोबातोबा-त्वेषाने लिहितात. मराठी सपादकाला हे शोभत नाही. असेच लिहीत गेल्यास त्याचा रक्तदाब का वाढू नये ?) ते लेख कसल्या-तरी आकसानेच लिहिले असले पाहिजेत, असे मला निश्चितपणे वाटले होते. कारण अकसाशिवाय प्रतिपक्षसहारक काही लिहिता येत नाही, असा माझा साक्षात अनुभव आहे. असो. ' महाराष्ट्र टाईम्स 'मधून झालेल्या टीकेला मराठवाडा विद्यापीठाने उत्तर पाठ-वले (मराठवाडा विद्यापीठ किती मागास-लेले आहे हे यावरून लक्षात येईल. पुढार-लेली विद्यापीठे अशी उत्तरेबित्तरे नाही हो देत) लगोलग, ' महाराष्ट्र टाईम्स 'मधल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने एक समिति नेमली. (आणि आपण सर्फ मागासलेले आहोत हे सिद्ध केले. मुबई विद्यापीठ पाहा किती पुढारलेले आहे : ' महाराष्ट्र टाईम्स 'ने मुबई विद्यापीठातल्या भ्रष्टाचाराबद्दल तिरिमिरीने पुष्कळ लिहिले; तेव्हा म्हणे मुबई विद्यापीठानेच ' महाराष्ट्र टाईम्स 'ची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली! ) समितीने नुकताच आपला अहवाल प्रसिद्ध केला असून त्यात, कुलगुरु नाथावर केले गेलेले आरोप खरे आहेत, असे स्वच्छ म्हटले आहे त्यामुळे समितीला बिचाऱ्या नाथां-बद्दल आकस असावा की काय, असे मला वाटू लागले आहे.

कारण नाथ भारतीय विद्यापीठातल्या कुलगुरूप्रमाणेच वागले, हा काही त्यांचा फार मोठा अपराध नव्हे. ते तसे वागले नसते तर मराठवाठा विद्यापीठाच्या प्रगतीचा वेग पार मदावला असता. जी प्रगती करायला कदाचित दहा-पधरा वर्षाचा दीर्घ कालावधी लागला असता ती नाथांनी अवघ्या तीन वर्षात उरकली आहे त्याची फेरनेमणूक झाली तर प्रगतीचा वेग अधिकच वाढून

लवकरच मराठवाडा विद्यापीठ ऑक्सफर्ड आणि केंब्रिजच्या तोडात मारायला लायक होईल, यात मला शंका वाटत नाही. माझ्यासारखी दूरदृष्टीची देणगी ज्याना दुर्दैवाने लाभलेली नाही ते महाशय मात्र, उताविळीने, नाथांना आता तरी हाकला हो हाकला, असा आक्रोश करीत आहेत. हा आक्रस्ताळी आक्रोश माझ्या विवेकी आवाजावर कदाचित मात करील.

पण अखेर, नाथांनी जे केले ते योग्यच केले, अशी साक्ष इतिहासाला द्यावी लागेल. गेल्या काही वर्षीत, मराठी ऐतिहासिक कादंबरीने, आपल्या इतिहासातल्या तथाकथित बदनामाना सद्नाम करून सोडले आहे. उद्या माझ्यासारख्या एखाद्या जिज्ञासू अभ्यासकाने निष्पक्षपातीपणाने व निराकस वृत्तीने कुलगुरु नाथाच्या उपक्रमबहुल कारकीर्दीचे निरीक्षण केले तर त्याला कुलगुरु नाथ हे एकनाथमहाराजाचे विसाव्या शतकातले अवतार आहेत, असा साक्षात्कार झाल्यावाचून राहाणार नाही. संताची भूमी, हा मराठवाड्याचा लौकिक आजसुद्धा सार्थ आहे तो हा असा !

## □ पार्टीलबुवा शाहीर साबळे

'अभ्यास कच्चा, वर्तणूक चागली' या चार शब्दात, मी शाळेत काढलेल्या दहा बारा वर्षाचे आणि केलेल्या सुमार प्रगतीचे सार ठीकठाक सांगता येईल. एक अभ्यास कच्चा असेल तर सगळेच कच्चे होते, हे मला छबिलदास लल्लुभाई बॉईज हायस्कूल, दादर, या माझ्या शाळेत पुरेपूर शिकायला मिळाले. मात्र, कच्चा अभ्यास पक्का करून टाकणे, त्यावेळी मला जमले नाही. उलट अभ्यास आणि शाळा सोडून द्यायचा विचार सारखा मनात यायचा. असे काही सोडणारी मुले पुढे मोठ्ठी माणसे होतात, असे मी ऐकले होते. त्याच्या चरित्रा-आत्मचरित्रात, शाळेत असताना त्यांच्या हळव्या मनाचा कसा कोडमारा होत होता, याचे भिजकेभिजके वर्णन येऊ शकते. शाळा सोडल्यावर कोठे जायचे, काय करायचे, याबद्दल माझा निश्चय होत नव्हता. माझे काही रवींद्रनाथासारखे नव्हते. त्यांनी शाळा सोडली आणि काही न करण्यासाठी ते खुश्शाल घरीच बसले. आमच्या घरी, असे बसण्यासाठी, जागा नव्हती. त्यामुळे शाळा सोडल्यावर घर सोडावेच लागणार होते. मला वाटायचे, आपल्याला व्यापारात डोके आहे मग तासचे तास माझा शेखमहंमदी व्यापार चालायचा. व्यापारापेक्षासुद्धा, आपण तमाशात जावे, असे मला जास्ती करून वाटायचे. तमाशात म्हणजे लोकनाट्यात: राष्ट्रसेवादलाच्या किंवा शाहीर साबळयांच्या लोकनाट्यात

शाहीर साबळे आणि पार्टी तेव्हा अगदी पोरसवदा दिसायची. (आत्तादेखील ती तशी योग्सवदा कुठे दिसते ?) चपळ शरीराच्या आणि चपळ गळयाच्या पाच-सात पोरकुल्याची ही पार्टी मिळेल त्या आडुक जागेत प्रयोग करायची. प्रयोग म्हणजे गाणी, सवाद, नकला आणि 'नशीब फुटके साधून घ्या' या किंवा अशा नावाचे एखादे उपहासगर्भ व तात्पर्याचे लोकनाटुकले म्हणजे करमणूक व्हायची; आणि तिच्यातून मतलबाची गोष्टही मिळायची. एकूण मजाचमजा यायची. त्यामुळे लोक गर्दी करायचे. गर्दीत बसल्याबसल्या मला आपले वाटायचे, साबळे आणि पार्टी जे जे काही करून राहिली आहे ते आपल्याला सहज करता येईल. ते अभ्यासापेक्षा अवघड आहे हे उशिरा कळले. तोपर्यंत, शाळा न सोडताच सुटली होती, आणि एका कुरठ्या कलामहाविद्यालयात आम्ही बरे घारेला लागलो होतो.

तरी आम्ही साबळे आणि पार्टीकडे तसे लक्ष ठेवून होतो. त्याचे बरे, अधिक बरे आणि अधिकच बरे चालले होते. त्यानी एका पाठोपाठ एक महत्त्वाकांक्षी लोकनाट्ये सादर केली. खुल्याखकाण्या रगमचावरून साबळे आणि पार्टी बदिस्त आणि वातानुकूलित नाट्यमदिरात गेली. (त्यामुळे ती मध्यमवर्गीय होऊन आम्हाला अधिक जवळचीही झाली.) शाहीर सावळयांबरोबर, राजा मयेकर आणि सुहास भालेकर या पार्टीकराना रसिकानी वेचून दाद दिली. (राजा मयेकरानी मध्यतरी पार्टी सोडली असे ऐकले तेव्हा साबळे आणि पार्टीचे उत्तमच चालले असले पाहिजे अशी खात्री झाली होती. 'पार्टी'चे उत्तम चालल्याशिवाय का कोणी तिच्यातून फुटून निघतो ?) साबळयानी स्वत.च्या मालकीचा 'फिरस्ता रगमच' ('मोबाईल थिएटर'ला याहून चांगला प्रतिशब्द मिळेल काय'—नाही मिळणार.) उभारला आणि तो ऐटीत गाडीवर टाकून पार्टी झंझावाती का काय म्हणतात तसले दौरे बृहन्महाराष्ट्रात करू लागली. तिने महाराष्ट्र आपला मानला; महाराष्ट्राने तिला आपली मानली.

शाहीर साबळे ही व्यक्ती नाही; ती पार्टी आहे. साबळे आणि पार्टीचे पार्टीलबुवा अर्थात स्वतः शाहीर साबळे. त्यांना नुकतेच पन्नासावे सरून एकावन्नावे वर्ष लागले आहे वाटत नाही. पण कोणाच्या वाटण्या न वाटण्याचा कुठे प्रश्न येतो ? गाणारी-बजावणारीनाचणारी पार्टी तब्बल अठ्ठावीस वर्षे साभाळली तर खरे म्हणजे एखाद्याने शभर शरदृऋतू ओलांडायला हवेत. असो. पन्नास वर्षे पुरी झाली म्हणून शाहीर साबळयांचा मुंबईत भव्य आणि नेत्रदीपक सत्कार झाला. राजकारणवाले, साहित्यवाले, नाटकवाले, सिनेमावाले, पोलिसवाले, आमत्रणवाले—सगळयांनी सत्कार समारभाला गर्दी करून सोडली होती. हे सगळे दिलवाले रसिकदेखील होते म्हणून बरे. नाहीतर दिलवाल्या शाहीरीची भलतीच दिल्लगी झाली असती ना.

वाढदिवसाच्या निमित्ताने आम्ही शाहीर साबळयांना हार्दिक शुभेच्छा देतो. अशा शुभेच्छा देणाऱ्याला, वाढाळू व्यक्तीला सल्ला देण्याचाही अधिकार सहजच प्राप्त होतो. आम्ही म्हणतो :

साबळे आणि पार्टी चांगली जुनीजाणती आहे.

ती थोडी नवीनेणती झाली तर काय हरकत आहे ? (काहीच नाही.)

—अनंतराव



# इथे माणसे माणसाला खातात!

वसंत ज. डोळस

या विसाव्या शतकात मानवाने चंद्रावर भरारी मारली आहे. इतका आश्चर्यकारक असा प्रगतीचा टप्पा त्याने गाठला आहे. पण या जगात आज दुसरीकडे असेही लोक आहेत की, जे आज विसाव्या शतकात असून देखील अश्मयुगातील जीवन जगत आहेत. आजही हे स्त्री-पुरुष नग्न वावरत आहेत. आजही त्यांच्या हालचाली पाहून अंगावर काटा उभा राहतो. अशीच एक हकीगत फादर आंद्रे यांनी सादर केली आहे. अर्थात ही हकीगत म्हणजे त्यांच्या न्यू गिनिच्या वास्तव्यात त्यांना आलेले अनुभव आहेत. या हकीगतीवर आपला विश्वास बसो अगर न बसो, पण हे एक सत्य आहे. चंद्राची सफर करण्यापेक्षा आणि मंगळावर स्वारी करण्याच्या योजना आखण्याअगोदर आपण आपल्या बांधवांत सुधारणा घडवून आणली तर किती बरे होईल नाही ?

बरेचसे मिशनरी जिवावर उदार होऊन या प्रदेशात जातात आणि तेथील लोकांना सुधारण्याचा प्रयत्न करतात. फादर आंद्रे ड्युपेरेत हे त्यापैकीच एक मिशनरी होत. त्यांनी न्यूगिनीतील नरभक्षक लोकांमध्ये राहाण्यात आपल्या आयुष्याची बरीच वर्षे खर्ची घातली आहेत.

न्यूगिनीच्या दुर्गम प्रदेशात फादर आंद्रेने जेव्हा पहिल्यांदा पाऊल टाकले तेव्हा त्यांना भयंकर अशी हकीगत समजली. त्या संदर्भात ते लिहितात.

" जेव्हा मी कूनीमायपाच्या दुर्गम प्रदेशात आलो तेव्हा तो भयंकर वाटणारा प्रदेश पाहून तोंडातून शब्द उमटेना. पेपुआच्या पहाडी प्रदेशात एक दरी दूरवर पसरली आहे. तेथील निसर्ग सौंदर्याचे वर्णन करण्यास माझ्या जवळचे शब्द तुटपुंजे ठरले.

सूर्याने आपली प्रकाशकिरणे त्या प्रदेशावर चोहीकडे पसरली होती. नदीच्या पात्रातून एक घाण दर्प येत होता आणि तो आजूबाजूचे वातावरणात मिसळत होता. कदाचित् घनदाट अरण्यातील कुजलेल्या पालापाचोळ्याचा हा प्रताप असावा. आजूबाजूला सभोवार पुरातन काळापासून छाती ताठ करून वृक्षगण उभे होते. आणि त्या वृक्षांवर रंगीबेरंगी किडे पेंगत होते. आजूबाजूच्या दुर्गंधीमध्ये या किडयांनी आणखी भरच घातली होती. एका मोठ्या वृक्षावर अजगर

होता. तो आपल्याच तोऱ्यात दिसत होता. त्या झाडाच्या खाली काळया रेतीत मगरी पसरल्या होत्या. बहुधा त्या झोपल्या असाव्यात.

सेंट जोसेफची दरी आम्ही मागे टाकली. होती त्या प्रदेशात आमचे मिशन गेल्या आठ वर्षापासून कार्य करीत होते आता आमच्या पुढे जी कुनीमायपाची खोल दरी पसरली होती त्यातील बहुतेक सर्व प्रदेश आम्हाला अज्ञात होता. या प्रदेशातील लोक हे भयंकर लोक ोहेत हे आम्ही अगोदरपासून ऐकत होतो.

दरीतील सौदर्यावर मी पुरता भाळून गेलो होतो. पण दुसरीकडे ही भयंकर भीती मनात पसरली होती. त्यामुळे मी चटकन् गवतावर बसलो.

माझे तिघे जोडीदार मात्र कुतूहलपूर्वक आजुबाजूला पहात होते. सध्याकाळच्या जेवणाची तयारी सुरू झाली असावी. कदाचित त्यांनी आम्हाला पाहिलेले नसावे. वेळ बराच झाला आहे. आता आपण परत फिरायला हव !"

परंतु परत जाण्याचा आता प्रश्नच नव्हता. त्याच लोकांशी सपर्क स्थापण्यासाठी तर मी इकडे आलो होतो. मग परत कसे फिरणार, नाही का ? मला त्या लोकाची भाषादेखील शिकायची होती. आतापर्यंत त्या लोकांनी कदाचित एकही गोरा माणूस पाहिला नसावा.

आम्ही त्या लोकांमध्ये जाऊन पोहोचलो. परतु स्वतःचा प्राण वाचविणे ही आता आमच्यापुढील मुख्य कामगिरी होती.

लांबलचक वाढलेल्या गवतातून लपत छपत आम्ही शेवटी त्या गावात जाऊन पोहोचलो. तेथील साऱ्या झोपडया दाटीवाटीने उभ्या होत्या. झोपडयातून घाण वास येत होता. तेथे जाऊन पोहचताच मला एक भयकर प्रसगाला तोड द्यावे लागले. तो सुमारे पन्नास माणसांचा एक मोर्चा होता. प्रत्येकाने कमरेभोवती झाडाची साल गुडाळली होती आणि तीदेखील कशीबशी. या व्यतिरिक्त त्याच्या शरिराचा सर्व भाग उघडा बोडकाच होता. आणि शरिराच्या उघडया भागावरून त्यांनी काळया आणि पाढऱ्या रगाचे वाटेल तसे पट्टे काढले होते. तसेच त्यांच्या शरिराचा दर्पही जीवघेणा असाच होता. ते जणू स्मशानातून उठून आलेल्या सैतानासारखे दिसत होते. त्यांनी चेहऱ्यावर आणि डोक्यावरदेखील निरनिराळया रगाचे पट्टे ओढलेले होते आणि असे ते विचित्र लोक अक्राळविक्राळ आवाज काढून त्या भयानकतेत अधिकच भर टाकीत होते.

काहीच्या हातात लाकडाच्या तलवारी होत्या आणि त्या ते मोठ्या अभिमानाने हवेत फिरवीत होते. एकाच्या हातात दगडाची गदा दिसत होती. ते सर्वजण त्या ठिकाणी उभे राहून उंच उडया मारीत होते. माझी तर अगदी पाचावर धारण बसली. ते एक पाऊल पुढे घेत आणि लगेच दोन पावले मागे जात, ते उजवीकडे एक पाऊल टाकीत आणि परत गरंकन वळून डावीकडे एक पाऊल टाकीत. परत सर्वजण एकदम पुढे सरसावत आणि त्याचबरोबर अक्राळविक्राळ आवाज काढीत.

कदाचित त्याच्या मनात मला भयभीत करण्याचा उद्देश असावा. आणि तसा मी पुरता घाबरलोही होतोच. पण मी तसं वरकरणी दाखविलं नाही. अगाला दरदरून घाम सुटला होता. तरी मुखावर मद स्मित दाखवीत मी पुढे सरकत होतो. माझ्या हातात एक छडी होती, तेच माझ्याजवळ एकमेव हत्यार होते. हातातील छडी मी हवेत फिरवली. 'तुम्हाला पाहून मला आनंदच झालाय' हे त्या खुणेने सांगण्यासाठीच असे केले होते.

नतर मी त्याच्या मुख्याजवळ जाऊन पोहोचलो. माझ्या हातात त्यावेळी एक छोटासा गोल आरसा होता. मी तो त्यांच्या मुख्याच्या तोडासमोर धरला. त्याने त्यात पाहिले आणि लगेच आश्चर्याने मोठयाने ओरडला. स्वत.चे प्रतिबिब आरशात पाहाण्याची त्याच्या आयुष्यातली कदाचित ही पहिलीच वेळ असावी. त्याच्या बरोबरच्या सर्वांनी त्याच्या भोवती कडेच केले. सर्वांना स्वत.चे प्रतिबिंब पहाण्याची घाई झाली होती. एकाएकी सर्वांनी मिळून लगेच गाणे म्हणायला सुरुवात केली. मला वाटले, त्यांनी माझा मित्र म्हणून स्वीकार केला आहे आणि माझ्या स्वागतासाठी ते हे स्वागतगीत म्हणत असावेत.

त्याच्या मुख्याच्या अगावर रगाचे पट्टे नव्हते की हातात एखादे हत्यारही नव्हते. त्याने येऊन मला कडकडून मिठी मारली आणि बोटाने इशारा करीत म्हणाला, 'गोलो पाई !'

हा माणूस त्याचा मुख्य होता यात आता काडीमात्र शका उरली नव्हती आणि तोच माणूस 'गोलोपोई' म्हणून स्वत चे नाव सागत होता.

मी उत्तरलो. 'मिशनरी' आणि स्वतःकडे मी अंगुली निर्देश केला.

नतर बराच वेळ गेला. नतर दोघे योद्धे भल्या मोठ्या डुकराचे पाय काठीला बांधून घेऊन येताना दिसले. माझ्याजवळ आल्यावर त्यानी माझ्या ते समोर टाकले नतर हातातील दगडी गदेचा त्यानी डुकराच्या डोक्यावर इतक्या जोराचा तडाखा दिला की, डुकराच्या डोक्याची कवटी फुटून मेंदूचे काही तुकडे बाहेर पडून ते अगदी माझ्या पायाजवळ येऊन पडले. नव्या मित्राचे स्वागत करण्याचा त्यांचा हा रिवाज होता.

गोलोपोईबरोबर माझी इतकी गट्टी जमली की, तो दिवसातून एकदा तरी माझ्याकडे येऊन तास दोन तास माझ्याजवळ बसत असे. पण त्याची मैत्री अजब वाटत होती. कारण माझी भाषा त्याला समजत नव्हती व त्याची भाषा मला समजत नव्हती. व त्याच्या मैत्रीचा उपयोग त्यांची भाषा शिकण्यासाठी मला होण्यासारखा होता. त्याची भाषा भीतिदायक होती. पण तीत एक प्रकारचे संगीत होते. मी खुणेने एखाद्या दगडाकडे बोट करीत असे. आणि तो मला त्या दगडाचे नाव त्याच्या भाषेत सांगत असे. मी लगेच ते नोटबुकात लिहून घेत असे. मी नाकाकडे बोट करीत असे. लगेच तो त्या भाषेत नाकाला काय म्हणतात ते सांगत असे. अशा रितीने माझे शब्दाचे ज्ञान वाढू लागले. मला त्या आदिवासीमध्ये इतके एकरूप होऊन राहायचे होते की, त्यांनाही वाटावे हे आपल्याचपैकी आहेत आणि त्या दृष्टीने हा प्रारभ होता.

एके दिवशी गोलोपाई भलत्याच वेळी माझ्याकडे आला. मला वाटल, एखादे महत्त्वाचे काम असल्याशिवाय गोलोपोई असा अवेळी माझ्याकडे येणार नाही. त्याने स्वत.चे धनुष्यबाण दाराबाहेरच ठेवले. नतर मला झोपडीकडे घेऊन गेला.

मला घेऊन तो आपल्या वाडयाकडे गेला.

समोर वाळलेल्या पानाचा भला मोठा ढीग होता. तो ढीग बाजूला करून त्याने त्या ढीगातून माणसाच्या दोन कवटया व काही हाडे बाहेर काढली. कवटया आणि हाडे पॉलिश केल्या सारखी चकचकीत दिसत होती.

'पाहिल आपण ?' माझ्याकडे वळून गोलोपोई म्हणाला, 'दोन-तीन दिवसांपूर्वी माझे आईवडील कोठे आहेत असे विचारले होते ?' ती पहा ती दोघेजण एका कवटीकडे बोट करून तो म्हणाला. 'हा माझा बाप !' आणि दुसऱ्या कवटीकडे बोट करून म्हणाला, 'ही माझी आई !'

आता मी त्याची भाषा चांगल्याप्रकारे समजू लागलो होतो मी उत्सुकतेने त्याला विचारले,

"तुझे आईवडील एकाएकी कसे काय निवर्तले ?' त्यावर थोडा वेळ अंतर्मुख होऊन नतर त्याने सर्व हकीकत सांगितली.

'ती दोघे म्हातारी झाली होती. म्हातारपणच आयुष्य कसं असतं याची आपणाला चांगलीच कल्पना असेल. माझे वडील इतके थकले होते की, छोटीशी कटयार देखील त्यांना चालविता येत नव्हती. त्याचे सर्वच्या सर्व दात पडले होते. आणि लहान मुलासारखी त्याची अवस्था झाली होती. आता माझ्या आईची हकीकत. तीही थकली होती. अंगावर सुरकुत्या पडल्या होत्या. त्या दोघांचं मरण जवळ येऊन ठेपल्याच मला दिसून आलं !'

'नतर पुढे काय ?'

'घिवेना गावात माझे बरेच मित्र आहेत. मी त्याची मदत मागितली. आणि ती त्यानी दिली. ते सर्वच्या सर्व आमच्या गावी आले. आणि त्यांच्यापैकी काहीनी माझ्या आईवडिलाना मेजवानीच निमत्रण देऊन त्यांची डोकी ठेचून काढली. नंतर त्या दोघाची मृत शरीरे दोन फायाना बांधून त्यांना त्यांनी आपल्या गावी नेले. तेथे गेल्यावर त्यानी त्यांना दगडी भट्टीत चांगल भाजून काढलं आणि त्यांना त्या सर्वांनी खाऊन टाकलं. नतर त्यांचा मी लहानपणापासून लाडका मुलगा होतो आणि माझीही त्यांच्यावर अतूट माया होती. आणि म्हणूनच त्याच्या कवटया आणि हाडे मी काळजी पूर्वक जपून ठेवली आहेत !'

पेपुआच्या डोंगराळ प्रदेशातील या आदिवासी लोकाचे जीवन दिसायला साधेसुधे आहे. मात्र त्याचे जीवन म्हणजे मला नेहमी एक रहस्य वाटायचे.

पेपुआच्या डोंगराळ प्रदेशातील गावे छोटी आहेत. झोपडया अगदी एकमेकांना खेटून उभ्या राहिलेल्या दिसतात. या झोपडया पानाच्या भिंती करून बाधतात. एखाद्या झोपडीत जरा कुठं खाट्खट् झालं की, लगेच त्याचे पडसाद साऱ्या गावात उमटतात.

नवरा बायकोचे भांडण झाले तरी ते घरात मिटत नाही. लगेच गावच्या चावडीकडे जाते. आणि भांडणाचा निकाल सध्याकाळच्या मुख्य जेवणाच्या वेळी लागतो.

एखाद्या वेळी नवरा झोपडीच्या बाहेर बसून बायकोला जेवण आणण्यास सांगतो. बायकोने जेवण आणण्यास विलब केला की लगेच भांडण जुपते. अगोदर नवरा रागात येतो बायको गप्प असते. मग बायको फॉर्मात येते. नि नवरा मूग गिळून गप्प बसतो.

एकदा एकाने आपल्या बायकोला चारपाच थपडा लगावल्या. लगेच तिने जगली रूप धारण केले. व मोठमोठयाने ओरडत गावच्या चावडीकडे पळाली. आणि ओरडायची एकाएकी थाबली. मग लगेच परत फिरली.

ती परत झोपडीकडे आली तेव्हा तिच्या हातात एक धारदार दगड होता. मला वाटले, ती आपल्या नवऱ्याचे शीर धडावेगळे करते की काय ?'

परतु तसे तिने काहीच केले नाही. ती माझ्याकडे आली. नंतर माझ्याकडे न पाहाता तशीच पुढे गेली. एका दगडावर हात ठेवला आणि नतर उजव्या हातात दगड घेऊन तिने इतक्या जोरात डाव्या हातावर मारला की क्षणार्धात डाव्या हाताचे बोट तुटून खाली पडले !'

त्या स्त्रीने आपल्या पतीकडे ढुकूनसुद्धा पाहिले नाही. थोडा वेळ जमिनीवर तुटून पडलेल्या बोटाकडे दृष्टिक्षेप टाकला नतर ते बोट उचलून झाडाच्या पानात गुंडाळून ती आपल्या झोपडीकडे निघून गेली.

या सर्व घटनेचा तिच्या नवऱ्याच्या मनावर चागलाच परिणाम झाला होता. तो गप्प बसला होता. नतर थोडया वेळाने डावा हात धरूनच त्याची बायको झोपडीच्या बाहेर आली. हाताला झालेली गंभीर स्वरूपाची जखम तिच्या ध्यानीमनीही नव्हती. ती मदस्मित करीत माझ्याकडे आली. नतर गोलोपोइने मला सांगितले की, तिच्या नवऱ्याने तिला किती वेळा मारले ते ती तुम्हास सांगत आहे. पण आपण तिच्याकडे जास्त लक्ष देऊ नका. कारण इकडच्या स्त्रिया नवऱ्याने झोडपल्याशिवाय कामच करीत नाहीत.

नतर मी उठलो. तिच्या डाव्या हातावर औषधोपचार करून पट्टी बांधली. नतर ती लढाईत विजयी झाल्यासारख्या वीरासारखी आपल्या झोपडीकडे गेली.

नवरा-बायकोचे भांडण झाल्यावर आपल्या डाव्या हाताचे बोट तोडून राग व्यक्त करकरण्याचा येथील स्त्रियांचा हा प्रघात जगाच्या पाठीवर कुठेही पहावयास मिळणार नाही असे मला वाटले. नतर माझ्या पहाण्यात हाताची दोन-दोन, तीन-तीन बोटे तोडून घेतलेल्या स्त्रिया आल्या.

एकदा माझा मित्र गोलोपोई मला बरोबर घेऊन दुसऱ्या शेजारच्या गावी चालला होता. तेथे पोहोचण्यास आम्हाला बराच उशीर झाला. झोपड्यातून धूर बाहेर पडत होता. गावाचे प्रमुख एका कॉटवर बसले होते. बाजूला नरभक्षक लोक बसले होते. उडया मारीत होते.

मी गोलोपोईकडे वळून विचारले, "हा कोणता उत्सव चाललाय् ?"

गोलोपोई काही न बोलता गप्प बसला. तो कसल्यातरी विचारात होता. तेथील लोकांनी आम्हाला तेथे कोडीत पकडले. कारण गोलोपोईने स्वतःच दोन चुका केल्या. पहिली म्हणजे, या गावात आल्याबरोबर त्याने आपले नाव त्या ग्राम प्रमुखास सांगितले नाही. दुसरी चूक म्हणजे, त्याने ओरडून सागितले की, 'मिशनरी आले आहेत !'

आणि त्याच्या या दोन चुकांमुळे सारे गाव आमच्याबरोबर दोन हात करण्यासाठी एकत्र जमा झाले होते.

ही चूक गोलोपोईच्या लक्षात आली व तो मोठमोठयाने लगेच स्वतःचे नाव सागू लागला पण बडबड गोंधळामुळे त्याचा आवाज गावच्या लोकांपर्यंत जाऊन पोहोचू शकला नाही.

नंतर गोलोपोई मला घाबऱ्या आवाजात म्हणाला, 'आपणाला इकडे आणलं नसतं तर फार बरं झालं असतं. आपणाला पाहून भिऊन या गावचे लोक पळून जाऊ लागले आहेत. आपण आता येथेच झाडीत लपा मी माझ्या सोबत्याला बोलावून त्याच्या मदतीने त्यांना थांबवितो.

पण या साऱ्या प्रकारामागे काय भानगड होती ते कारण शोधून काढण्याचा मी निश्चय केला आणि म्हणूनच तेथे झाडीत लपून न बसता मी उतारावरून धापा टाकीतच खाली गावात आलो.

तेथे गावाच्या मुख्य भिंतीजवळ गाव-प्रमुखाने माझा काटा काढण्यासाठी नरभक्षक माणसाची टोळी अगोदरच जय्यत तयारी-निशी ठेवली होती. परंतु मला पाहताच त्यांची भीती दूर पळाली. आणि त्यांनी माझ्यापुढे नृत्य सुरू केले. या साऱ्या गोष्टीशी मी आता चांगलाच परिचित झालो होतो.

मी गावात शिरलो. तेव्हा अंगावर शहारेच आले. गोलोपोईने झाडीत लपून बसण्यास मला सांगितले होते. ते मात्र माझ्या पटकन् लक्षात आले. माणसांचे मास भाजून त्यावर सर्वजण ताव मारीत उत्सव साजरा करण्याच्या वेळीच आम्ही नेमके तेथे टपकलो होतो. लांब अंतरावरून काही अर्धवट उघड्या अशा भट्ट्या दिसल्या. आजुबाजूला माणसाच्या भाजलेल्या मासाचे ढीग पडले होते. त्यातील काही मांसाचे तुकडे तर अर्ध-वट भाजलेले होते. भाजलेले मासाचे तुकडे इतके गरम होते की, त्यातून गरम वाफ बाहेर पडत होती.

माणसाचे मास शिजविण्याची किंवा भाजण्याची पद्धत पुरातन काळापासून चालत आलेली होती. पुरुष एखाद्या माणसाची शिकार करून त्याला मारून आणीत असे. माणसाचे बारीक बारीक तुकडे करण्याचे कामही त्याचेच. नंतर चकमकी दगडापासून त्याची बायको विस्तव तयार करते. अर्थात हा विस्तव झाडाच्या लाकडापासून व पाला-पाचोळ्यापासून करतात. नतर विस्तवावर चपट्या आकाराचे दगड ठेवतात. दगड गरम झाल्यावर त्यावर माणसाच्या शरिराचे तुकडे भाजण्यात येतात.

मासाचे तुकडे भाजण्याची दुसरीही पद्धत आहे. त्यासाठी ते तीन फूट खोल, नऊ फूट लांब आणि दोन फूट रूंदीचा खड्डा खणतात.

शिकार केलेल्या माणसाचे मास भाजण्या साठी छोटे छोटे तुकडे पुरुषानी केल्यावर स्त्रिया ते तुकडे भाजण्यासाठी पुढे सरसा-वतात. झाडाची कदमुळे व मासाचे तुकडे त्या भट्टीत टाकतात. भाजलेल्या मांसाच्या तुकड्यावर ते मिठाऐवजी थोडी राख टाकतात. नंतर परत वरून पालापाचोळा टाकतात मांसाचे तुकडे भाजावयास दोन तीन तास लागतात. भट्टीतून बाहेर पडणारा धूर एक वेगळाच भयंकर वास घेऊन बाहेर पडतो.

मास भाजण्याच्या भट्टीच्या आसपास धगधगत्या विस्तवावर बांबूच्या पोकळ नळ्या तापविण्यात येत होत्या. बांबूच्या नळ्या अगदी मधोमध सांध्यावर कापल्या-मुळे त्यांची दोन्ही बाजूची तोंडे बदच होती. त्यातीला एका टोकाला मोठे छिद्र पाडण्यात आले. नंतर दातांनी आणि नखांनी स्त्रिया भाजलेल्या मासाचे बारीक तुकडे करून ते त्या बांबूच्या नळीत भरू लागल्या. अधून मधून झाडांची कंदमुळेही त्यात मसाल्या-सारखी भरली जात होती. नंतर नळी भर-गच्च भरल्यावर छिद्र बद करून त्या जळत्या अग्नीवर टांगतात. थोड्या वेळाने उष्णतेने नळी चांगलीच गरम होते. व मोठा आवाज होऊन फुटते असे झाल्यावरच त्या स्त्रिया मांस खाण्यालायक झाले असे समजतात.

याच ठिकाणी मला आणखी एक भयकर दृश्य पहावयास मिळाले आणि त्यामुळे माझे सारे शरीर लटपटू लागले. समोर एका मुलीचे नुकतेच कापलेले व रक्तानेच ओथंब-लेले शिर होते. मुलीचे वय दहा वर्षाहून अधिक नसावे. हे शिर कापून लांबून फेकण्यात आले होते व ते येथे धुळीत येऊन पडले होते. मी ते हातात उचलून घेतले. कुणी त्याच्या डोक्यावर एक खोल छिद्र पाडले होते आणि त्यातून डोक्यातील मेंदू काढून घेण्यात आला होता. कच्चे अंडे फोडून प्यावे त्याचप्रमाणे त्या मुलीचा मेंदू कुणीतरी खाऊन टाकला होता.

माझे डोके ते भयानक दृश्य पाहून भणा-णून गेले. होते. खरा प्रकार लक्षात येण्या-साठी मी आजुबाजूला पाहात होतो. ते नर-भक्षक आता तर पाठीला पाय लावून पळाले होते. पण पुढे तेच काय करतील याचा नेम नव्हता.

या गावात मी ज्या दिवशी आलो त्याच दिवशी सारखी इकडून तिकडे येरझारा घालणारी एक स्त्री माझ्या दृष्टीस पडली. ती गरोदर होती व भविष्यात माता बनणार होती.

एके दिवशी सकाळी मी सिगारेट ओढीत एका झोपडीपुढे बसलो होतो. त्यावेळी ती स्त्री गावातून बाहेर चालली होती. तिला प्रसूतीच्या वेदना होत होत्या, असे तिच्या मुद्रेवरून दिसत होते. तिच्या बरोबर तीन वृद्ध स्त्रियासुद्धा चालल्या होत्या. त्या प्रत्येक वृद्ध स्त्रीबरोबर प्रत्येकी एक एक डुकरीण पिलांसमवेत चालली होती. हे सारे कशा-साठी चालले होते हे माझ्या ध्यानात येईना.

दुपारनतर हे गावाबाहेर पडलेले लटांबर परत आले. ती गरोदर स्त्री आता माता बनली होती. तिच्या पोटावर झाडाची लांब-लचक साल बांधण्यात आली होती. आणि बाळतिणीच्या कडेवर लहान बाळ नव्हते. तर डुकराचे एक लहानसे पिल्लू होते. आणि ते पिल्लू तिच्या छातीवर स्तनपान करीत असल्याचे दृश्य पाहून माझाच माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना.

या पूर्वी मला असे कळले होते की, या भागातील तरुणी पहिल्या मुलाचा जन्म होताच डुकराच्या पिलाला दूध पाजता यावे म्हणून आपल्या मुलाला ठार करतात. पण ही सारी अफवा असावी असे मला वाटले होते. पण ती अखेर सत्य स्वरुपात आज माझ्यासमोर प्रकट झाली होती.

त्याच वेळी त्या गावच्या प्रमुखास एका जोडीदाराला मी जवळ बोलाविले. त्याला सिगरेट देऊन काही महत्त्वाची पृच्छा केली. त्याला मी तिकडच्या विषयावर चारदोन गप्पा मारल्यावर मी मूळ विषयाला हात घालीत म्हटल, 'आपल्याकडे डुकरांना फारच मान दिला जातो!'

त्यावर तो म्हणाला, 'आमच्या इकडच्या स्त्रिया डुकराच्या पिलाचे पालन पोषण अगदी डोळ्यात तेल घालून करतात!'

त्यावर नुकत्याच स्वतःच्या छातीवर पोटच्या मुलांप्रमाणे डुकरांच्या पिलांना दूध पाजीत गेलेल्या स्त्रीचा विषय मी काढला.

त्यावर तो म्हणाला, 'तिच हे पहिलं-बाळतपण आहे!'

त्यानतर त्याच्याकडून रोमहर्षक अशी

हकीकत ऐकायला मिळाली. तो म्हणाला,

'आमच्या इकडच्या स्त्रिया पहिल्या प्रसूतीच्या वेदना सुरू होताच पोक्त स्त्रियांना बोलावितात. त्या अशाच स्त्रियांना बोलवितात की, ज्यांच्याजवळ छोटी छोटी पिलं असणाऱ्या डुकरिणी आहेत. नंतर हा सर्व कंपू झऱ्याकडे जातो.

'झऱ्याजवळ ती गरोदर स्त्री झोपते. मग त्या तीन स्त्रिया मोठमोठ्याने शिव्या देण्यास सुरवात करतात व त्याच बरोबर त्या प्रसूत होणाऱ्या स्त्रीला खूप बडवतात. एवढेच करून त्या थांबत नाहीत तर त्या स्त्रीच्या छातीवर बसतात, छातीवर उड्या मारतात. हे सारं ती स्त्री लवकर प्रसूत व्हावी यासाठी चाललेलं असतं.'

'ती स्त्री प्रसूत झाल्यावर जिवंत राहील किंवा नाही आणि तिचं मूल जिवंत राहील की नाही या गोष्टी आदिवासींच्या दृष्टीने गौण आहेत.'

'पहिलं मूल जन्माला आल्यावर त्याची जन्मदात्री माताच तीक्ष्ण दगडाने त्याचा चेंदामेंदा करते. नंतर ती स्वतःच वाळूत एक खोल खड्डा खणून मुलाचा नाळ पुरून टाकते. नंतर ती पाण्यानं स्नान करते.'

'मातेनं मुलाला ठार केल्यावर वृद्ध स्त्रिया आपल्याबरोबर आणलेल्या डुकरीणी त्या इवल्याशा बालकाचा मृत देह खाण्यासाठी सोडतात. डुकरीणी त्या अर्भकावर तुटून पडतात. आणि हे सारं भयंकर दृश्य ती जन्मदात्री माता दुरून पहात असते. निर्विकारपणे.'

'नंतर डुकरिणीचे एक पिलू ती बाळंतीण उचलून घेते.
त्याला आंघोळ घालते. नंतर लगेच त्याला छातीवर धरून दूध पाजते आणि तेव्हापासून डुकराचं ते पिलू त्या स्त्रीचं मूल बनतं.


हा सारा प्रकार फक्त स्त्रीच्या पहिल्याच प्रसुतीच्या वेळी पहावयास मिळतो. नंतर होणाऱ्या मुलाबाळावर मात्र तिचा पूर्ण अधिकार असतो.

'पहिलं मूल म्हणून जवळ बाळगलेलं डुकराचं पिलू जितकं मोठं होईल तेवढं ती स्त्री व तिचा नवरा गावच्या प्रशंसेस पात्र ठरतात.'

मानवतेला काळिमा फासणारे हे भयंकर प्रघात, प्रथा नि रीतिरिवाज आज या विसाव्या शतकातदेखील तेथे पहावयास मिळतात. या सर्वांमागचा मूळ उद्देश काय? असे जर एखाद्या तरुण आदिवासीला विचारले तर तो सांगेल, आमचे आई-वडील पूर्वीपासून हेच करीत आले आहेत म्हणून आम्ही करीत आहोत.'

या अंधश्रद्धेमुळे मानवतेला काळिमा फासून आज तेथील जे लोक पशुपेक्षाही हीन असे जीवन जगत आहेत तेही याच मानवाचे बंधु आहेत. सुधारलेल्या मानवतेची तत्त्वे त्यांनाही लागू आहेत. मग आज आपण आपल्याच मानव जातीचे कल्याण साधावयाचे सोडून अमाप खर्च करून इतर ग्रहाकडे कशासाठी धाव घेत आहोत? आपलेच वैगुण्य झाकण्यासाठी हा आटापिटा कशासाठी व का करीत आहोत? ◻

**[श्री. आँन्द्रेप्यूपरेन यांच्या 'न्यू-गिनी' या पुस्तकावर आधारित]**

# चिली :

## लष्करी राजवटीचे एक वर्ष

वा. दा. रानडे

चिलीचे मार्क्सवादी अध्यक्ष साल्व्हाडोर आयेंदे याची राजवट उलथून तेथे लष्करी हुकूमशाही स्थापन झाल्याला ११ सप्टेंबरला एक वर्ष पुरे झाले. ऑगस्टो पिनोचेर यांच्या नेतृत्वाखालील या राजवटीने एक वर्षात काय साधले ? ही राजवट कितपत स्थिरावत आहे? तेथे डावे गट पुन्हा अधिकारावर येण्याची कितपत शक्यता आहे ?

पहिली गोष्ट म्हणजे ऑगस्टो पिनोचेर यांनी बदुकीच्या व दहशतीच्या जोरावरच आपली सत्ता टिकविली आहे. ही सत्ता स्थापण्यासाठी पंधरा हजार ते वीस हजार लोकाची कत्तल लष्कराने केली. परिस्थिती आता सुरळीत असल्याचे ते वरवर कितीही भासवीत असले तरी या देशात लोकशाही प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने त्यानी कोणतीही पावले टाकलेली नाहीत. 'अतर्गत युद्धाची परिस्थिती त्यानी अजून ठेवली आहे. ही परिस्थिती जारी केल्याने मिळालेल्या अधिकारानुसार लष्करी अधिकारी कोणालाही अटक करू शकतात. आयेंदेराजवटी विरुद्ध लष्करी उठावास ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाने मदत केली होती पण त्या पक्षालाही चिलीत बदी आहे, मतदारयाद्या, मतनोंदणीची पुस्तके जाळून टाकण्यात आली आहेत. कामगारसघटनांना बदी याहे. सप बेकायदा ठरविण्यात आले आहेत. अंतर्गत राजकारणासबधी कोणतीही बातमी छापण्यास वृत्तपत्राना बदी आहे. जे परदेशी पत्रकार किंवा वार्ताहर आपल्या बातम्यात लष्करी राजवटीच्या सांगण्यानुसार बदल करीत नाहीत त्याना ताबडतोब हद्दपार करण्यात आयेंदे ज्या परदेशी वृत्तसंथा तेथे अजून टिकून आहेत त्याना लष्करी राजवट सांगेल त्याच स्वरुपात बातम्या द्याव्या लागत आहेत.

अध्यक्ष आयेंदे चलनवाढीला आळा घालू शकले नाहीत हे त्यांच्या अपयशाचे एक कारण सांगितले जाते, पण लष्करी हुकूमशहा पिनोचेर तरी चलनवाढीला कोठे आळा घालू शकले ? जुलै १९७३ अखेरच्या बारा महिन्यात आयेंदे राजवटीत किमतीमध्ये ७०४-५ टक्के वाढ झाली होती म्हणजे किमती सातपटी पेक्षा अधिक वाढल्या होत्या. त्यानंतरच्या बारा महिन्यात (म्हणजे आयेंदे राजवटीचे ५ आठवडे व पिनोचेर राजवटीचे ४७ आठवडे) किमती ६७८·१ टक्क्यांनी वाढल्या गेल्या. वर्षाच्या तुलनेने हा आकडा कमी वाटला तरी या मुदतीत कामगारांच्या पगारात फारच थोडी वाढ झाली असून प्रत्यक्षात त्यांना चलनवाढ आयेंदे राजवटीपेक्षाही अधिक जाणवत आहे. दुकानात माल घ्यायला गिऱ्हाईकच नाही अशी तक्रार दुकानदार करीत असून कारखान्यातून मालाचे साठे पडून आहेत.

बेकारांची परिस्थिती तर याहून हलाखीची आहे. लष्करी राजवटीच्या एक वर्षात बेकारांची संख्या दुपटीने वाढली. सरकारी खाती व राष्ट्रीयीकरण झालेल्या कारखान्यातील अनेक कामगार लष्करी राजवटीने जादा म्हणून काढून टाकले पण त्यांना दुसरीकडे रोजगार देण्याची मात्र व्यवस्था केली नाही. तसेच हे कामगार कमी करताना कार्यक्षमतेची कसोटी न लावता राजकीय सूडाचे धोरण अवलंबून डाव्या गटाच्या पक्षाबद्दल सहानुभूती असलेल्या कामगारांना नेमके वेचून काढून टाकले.

लष्करी राजवटीला आतरराष्ट्रीय बँकेकडून आणि ब्रिटन व इतर काही देशाकडून कर्जे मिळाली तरी तांब्याचे उत्पादन वगळता बाकी सर्व बाबतीत आर्थिक प्रगती थडावलेली आहे. श्रीमत वर्गाने आपली श्रीमती पुन्हा मिळविली आहे, पण बहुसंख्य कामगाराची हलाखी वाढली आहे. आयेंदे राजवटीने तीन वर्षात त्याचे राहणीमान सुधारले होते पण त्या सवलती लष्करी राजवटीने काढून घेतल्या आहेत.

या परिस्थितीत नजीकच्या काळात काही बदल होण्याची शक्यता दिसत नाही. लष्करी राजवटीस विरोध करण्याचे काही तुरळक प्रकार होत असले तरी सघटित भूमिगत चळवळ उभी राहिलेली नाही. परदेशात आसरा घेतलेल्या गटातही प्रतिकार चळवळ उभारण्याच्या बाबतीत अजून एकजूट दिसत नाही. आयेंदे राजवटीच्या पाडावाला जबाबदार कोण याची त्यानी चालविलेली चिकित्सा अजूनही सपलेली नाही कट्टर डाव्याची टीका अशी की आयेंदे यानी पुरेसा लढाऊपणा दाखविला नाही. कामगार वर्गाच्या सामर्थ्यावर त्याचा विश्वास नव्हता. एका बाजूला बदनाम झालेल्या मॉस्कोवादी कम्युनिस्ट पक्षाशी व दुसऱ्या बाजूला भांडवलदार वर्गाच्या काही गटांशी त्यांनी आघाडी केली. कट्टर डाव्यांचे हे म्हणणे अंशतः खरे आहे पण तेवढयाने चिलीतील घटनांचा पूर्ण उलगडा होत नाही. लोकशाही मार्गाने समाजवाद आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आयेंदे यांनी केला पण सर्वांचे सहकार्य असेल तरच हा मार्ग यशस्वी होतो. निवडणुकात लोकशाही मार्गाने डाव्यांच्या हाती सत्ता गेली आणि आपल्या हितसबंधाना धोका निर्माण झाला तर भांडवलदारवर्ग लोकशाही गुडाळून ठेवून लष्करी उठाव घडवून आणतात. बडी भांडवलदार राष्ट्रे त्याना मदत करतात. हा अनुभव पूर्वी स्पेनमध्ये आलेला आहे. चिलीमध्ये असेच घडले. तेथे लष्करी राजवट आणण्यात अमेरिकेचा काही हात नव्हता असे अमेरिकन सरकारने त्यावेळी जाहीर केले होते पण आता एक वर्षानंतर तेथील सी. आय. ए. च्या हालचालीची आणि अमेरिकन हस्तक्षेपाची कबुली स्वतः अध्यक्ष फोर्ड यांनीच दिली आहे. भांडवलदार वर्गाचे हे डावपेच व कट आधीच हेरून त्याला तोंड देण्याची तयारी आयेंदे सरकारने व आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीने करायला हवी होती. चिलीतील लष्करी क्रांती हे केवळ आयेंदे याचे अपयश नसून आतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचेही अपयश आहे पण याबाबतीत शाब्दिक निषेध व्यक्त करण्यापलीकडे रशिया व चीन या दोन मोठया कम्युनिस्ट राष्ट्रानी काहीही केले नाही. आयेंदे यांना पाडण्यासाठी हस्तक्षेप कराल तर आंतरराष्ट्रीय सघर्ष होईल असा इशारा रशियाने दिला असता तर त्यातून काही एकदम 'जागतिक युद्ध पेटले असते असे नव्हे. (कारण जागतिक युद्धात सर्वनाश आहे हे आता दोन्ही बाजूनी ओळखलेले आहे ) पण लष्करी उठावाच्या कारवायाना काही प्रमाणात तरी पायबंद बसला असता. पण रशिया व चीनने अमेरिकेशी जे नव्याने सहकार्याचे संबध जोडले होते, त्याच्याशी बाध येईल असे त्याना काही करावयाचे नव्हते. चिलीतील आयेंदेची राजवट वाचविण्यापेक्षा आपल्या या हितसबधाचे रक्षण करणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटले.

लष्करी उठावाला पाठिंबा देण्यात आपली चूक झाली याची जाणीव ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षातील एका गटाला आता झाली असून लष्करी हुकूमशाही नष्ट करण्यासाठी कम्युनिस्ट व डाव्या गटांशी सहकार्य केले पाहिजे असे हा गट प्रतिपादू लागला आहे. □

# इज्जत....इज्जत....इज्जत

रमेश् के. जोशी

काही काही शब्दच असे असतात की त्या शब्दाचा उच्चार डोक्यात येताच पाठीचा कणा ताठ होतो, छाती थोडीशी का होईना रुदावते. डोळ्यात एक चमक येते, मिशीवर मूठ फिरवावीशी वाटते. समोरच्या दगडाला लाथ घालावीशी वाटते. ही जातकुळी सांगणाऱ्या शब्दांना कुठेही मज्जाव नाही. नरिमन पॉइंटवरच्या तेवीसाव्या मजल्यापासून धारावीच्या खुराड्यात, पांढऱ्या टोपीपासून ते चटेरी-पटेरी मॉड पोशाखात दरवडेखोर, खुनी यापासून ते कोपऱ्यावरील भाजीवालीपर्यंत कोठेही या जातकुळीच्या शब्दाचा सचार आढळतो. सूड, हिम्मत, जिद्द, पराकाष्ठा, इज्जत...सूड हा शब्द जर सोडला तर बाकीचे सर्व शब्द स्त्रीलिंगी पण पराकोटीचे ! ताठ, कणखर. कोणतीही सस्था असो एखादीच मोक्याच्या ठिकाणाची व्यक्ती कोणताही प्रश्न आपल्या सस्थेच्या इज्जतीचा मानते, आपली सारी जिद्द पणाला लावते व सस्था वर येते. बाकी मडळी आपली ओढली जातात म्हणून चालली जातात. इज्जतीसाठी जान कुर्बान केल्याची सुद्धा उदाहरणे असतील, पण म्हणून लहानसहान व्यक्तिचे महत्त्व कमी तर होत नाहीच उलट आजच्या नकली सस्कृतीत तर ते अधिकच प्रकर्षाने जाणवते.

मरूभूमीतील – राजस्थानच्या वाळवंटातील एक रणरणती दुपार. दिल्ली सकाळी दहा वाजता सोडली तेव्हा तपमान होते ११५°. अल्वरला दुपारी १ वाजता जेवलो तेव्हा तिथले तपमान होते ११८° च्या आसपास. सेरेस्कावरून पुढे सरकलो आणि एका धुळीच्या वादळात सापडलो. गाडीच्या पुढचे काहीच दिसत नव्हते. वाळूमात्र गाडीच्या एका बाजूला तड्तड् करीत आदळत होती. इलाजच नव्हता. काचा बंद करून भट्टीत बसल्याप्रमाणे बसलो होतो. काचांच्या फटीतून स्प्रे केल्याप्रमाणे वाळू गाडीत घुसत होती. आधीच घामामुळे शरीर चिप्प झाले होते. त्याच घामावर गरम गरम वाळू चिकटत होती. हैराण झालो होतो. पण दरिबाला पोचेपर्यंत करतो काय ? गाडीचा सरदारजी ड्रायव्हर तर वैतागलाच होता. पुन्हा पुन्हा दरिबाला न येण्याची प्रतिज्ञा करीत होता. वादळ जरा शमले. आम्ही दोघे खाली उतरलो. शहाणपणा करून दिल्लीहून माझ्या मित्राने दिलेला पाण्याचा मोठा जग काढला. डोके, तोंड, हात, पाय जिथे जिथे म्हणून पाणी पोहोचू शकत होतं तिथ तिथं पाणी लावले आणि मजेत सिगरेट पेटवली. इतक्यात गाडीच्या मागून हॉर्न ऐकू आला. सहज मागे पाहिले. मिलिटरीची एक जीप, त्यात बसलेली चार-पाच २० च्या आतील मरगळलेली तरणीबाड लेफ्टनटच्या हुद्द्याची पोरे, गाडीमागोमाग तीन-चार पोरे, ढेपाळलेली, त्रस्त झालेली कशीबशी पाय ओढीत चाललेली, सबंध बॅटल युनिफॉर्म अगावर, तोही धुळीने माखलेला. त्या पोरांच्या मागोमाग आला एक लष्करी शिस्तीत पावले टाकणारा, मिशांचे कल्ले वाढवलेला उंचापुरा ताठ, छाती पुढे काढून चालणारा सुभेदार मेजर. आपण तर यार त्याच्यावर खूश झालो. वाळवट, वाळूचे वादळ, आत्यतिक उष्णतामान याच्या पार्श्वभूमीवर हे काहीतरी भलतेच विसंगत दिसत होते. हा सुभेदार मेजर जणूकाही २६ जानेवारीच्या दिल्लीच्या परेडमध्येच मजेत पावले टाकीत चालत होता. ही माळका पाचच मिनिटात रस्त्याने अदृश्य झाली. आमची विश्रांती सपली. सावकाश सावकाश ३।। च्या सुमारास दरिबाला येऊन पोचलो. उतरल्याबरोबर विहिरीवर जाऊन आघोळ केली दुसरे कपडे घातले. व कामावर चक्कर लगावून आलो. चारच्या सुमारास कॅपच्या व्हरांड्यात बसून चहाचे घोट ढकलीत होतो तोच पुन्हा त्याच जीपचा हॉर्न ऐकू आला. आता सर्वच पोरे जीपमध्ये, जीपवर, जीपच्या आधाराने होती व तीच पन्नाशीच्या जवळपासची व्यक्ती, सुभेदार मेजर, मान उच, छाती ताठ ठेवून शिस्तीत चालत होती. पाठ, छाती घामाने ओले झाल्याचे कळत होते, चेहऱ्यावर वाळूची पुटे चढलेली दिसत होती. एक घाम जर सोडला तर थकव्याचे लक्षण कोठेही दिसत नव्हते.

जीप समोर येऊन थाबली. जीपमधल्या वळकट्या आता उलगडल्या गेल्या. सारी पोरे पिपाच्या नळावर पळाली. सुभेदार मेजर माझ्यासमोर येऊन उभे राहिले. माझ्या बेअररला मी पाणी आणायला सांगितले. चहा करायला सांगितला. एव्हाना सुभेदार-साहेब ताजेतवाने झाले होते.

'काय सुभेदारसाहेब किती दौड मारली ?' मी विचारले.

'बस्, करीब बीस मैल होगी' सुभेदार म्हणाले.

'सुभेदारसाब ये आपके जो जवान है' मी म्हणालो, ते तर दमून भागून जीपमध्ये बसले. आपले वय तर पन्नाशीला आले. आपण का नाही बसलात ? जीपमध्ये बसला असतात तर काय बिघडले असते ?'

पहाता पहाता डोळे थरथरले, छाती पुढे आली, मान उचावली गेली आणि उत्तर आले.

'भाईसाब हम जीपमें तो कॅप छोडनेके बादही बैठ गये – चलती जो थी वो तो हमारी इज्जत थी – सुभेदार मेजरकी इज्जत थी. हम कहाँ चलते थे ?'

आर्मीमध्ये सुभेदार मेजर ही काही अथांग-अपरपार अशी चीज असते, जनरलसुद्धा त्या चीजेला 'सुभेदारसाब' अशी आदबीनेच हाक मारतो असे ऐकून होतो. आज तो 'सुभेदारसाब' त्याच्या

इज्जतीत इथे वाळवटात उभा होता. मी खाडदिशी उभा राहिलो व एक सॅल्यूट त्याला ठोकला, त्याच्या इज्जतीला. ¤

प्रयागमधील गेल्या वर्षीची वसतपचमी. बोचरी थडी अजूनही रेंगाळत असते. दुपारी थोड्या गरम होऊ लागलेल्या असतात. पिके वगैरे कापून मळून बाजारात आलेली असतात. गगामैय्याची कृपा या प्रदेशावर तर नेहमीच असते. त्यामुळे सुबत्ता भरपूर. पण फक्त जमीनवाल्याकडेच. इतराचे आपले नेहमीचेच. वसतपचमीच्या मुहूर्तावर संगमात डुबकी मारली पाहिजे यावर मात्र साऱ्यांचेच एकमत. त्याबाबतीत कडवी समानता. लहान–थोर, श्रीमत–गरीब, मालक–नौकर आपले सारे उद्योग सोडून चालू लागणार सगमावर. तर असा हा वसतपचमीचा दिवस. नेहमीप्रमाणे गेस्ट हाऊसवरून निघालो नऊ वाजता. गेस्ट हाऊसवरून नैनीला जायचे म्हणजे यमुना ओलांडावी लागते. एक चांगला तगडा, जुनापुराणा, पण अजून भक्कम पूल जम्नाजीवर आहे. हा पूल इतका जुना आहे की बहुधा तो पुराणवस्तू व ऐतिहासिक महत्त्वाच्या यादीत समाविष्ट असावा. तो उभा केल्यापासून कोणत्याही खात्याने त्याला हात म्हणून लावलेला नाही.

सांगायची गोष्ट म्हणजे सकाळी ९ वाजता गेस्ट हाऊसमधून निघालो. सारे रस्ते माणसानी दुथडी भरून वहात होते. त्या भरलेल्या रस्त्यातून मार्ग काढीत काढीत जमुनेचा पूल तर पार केला. जिथवर दृष्टी पोहोचेल तेथवर डोकीच डोकी दिसत होती. नेहमीच्या १५ मिनिटाच्या रस्त्याला आज तासाच्यावर वेळ लागला होता. नैनीच्या परिसरात प्रवेश केला होता पण गाडी काही पुढे सरकत नव्हती. सारी रहदारी ठप्प झाली होती. क्वचित एखादी सायकल-रिक्षा शेजारून खिजवीत जात होती. सुमारे ३०–३५ मिनिटांनतर शॉपवर पोहोचण्याच्या उरल्यासुरल्या आशा नष्ट झाल्या. जिथे आम्ही अडकलो होतो तेथून जेमतेम फर्लांगभर अतरावर आमची बँक होती. बँकेत जावे व तेथूनच पुढे गर्दी जरा ओसरल्यावर पुढे जावे असा विचार करून पदाती होऊन बँकेत निघालो.

नयनीची ही बँक थोडी रस्त्याच्या आत आहे. रस्त्यावरून बँकेची पाटीसुद्धा दिसू शकत नाही. बाजूच्या रस्त्यावर गेलो आणि सुस्कारा सोडला. बहुधा नदीकडे न जाणारा हा रस्ता होता. बँकेच्या कंपाऊडमध्ये शिरलो. पहातो तो बँकेचे दार बंद. जरा निरखून पाहिले, कुलूपे तर दिसत नव्हती म्हणजे आत नक्कीच कोणीतरी होते. जवळ जाऊन इतर कोठून प्रवेश मिळतो का पाहिले, दार खटखटवले पण काही हालचाल ऐकू येईना. शेवटी तसाच परत निघालो. तोच दाराच्यावरची एक व्हेंटीलेटर उघडली गेली आणि हाक ऐकू आली. ऐकून परत फिरलो. दार उघडले गेले. बँकेचा एजंट माझे स्वागत करीत उभा होता. नमस्कार चमत्कार झाले. माझ्या मागचं दार एजटसाहेबाने पुन्हा बंद केले. मी बँकेत पाहिले काउटर्स पार रिकामे होते. काउंटर्सच्या पाठीमागची टेबले. स्वच्छ आवरून ठेवलेली–जणू काही नीटनेटकेपणा आणि स्वच्छता याची चढाओढच चालू होती. नेहमीच्या शिपायाचा पत्ता नव्हता. कॅशियरच्या खोलीबाहेर उभा असणारा पिळदार मिशांचा व गलेलठ्ठ चेहऱ्याचा रक्षकही तेथे नव्हता. प्रयागला सर्वत्र कर्मचारी अर्ध्याएक तासाने पान खाण्याची सुट्टी घेतात, पण आज जणू सगळ्यांनी एकदमच पानाची सुट्टी घेतल्यासारखे दिसत होते. मी जरा दिङ्‌मूढ होऊनच उभा राहिलो.

'क्या जोशीसाब क्या देखते हो?'

'आज काय सारे कर्मचारी सपावर गेलेत की काय' मी विचारतो.

'अजी साहेब, ये तो मुसीबत है यहाँ की' एजटसाहेब सांगू लागतात.

'प्रयागमध्ये इतके मेळे आणि त्योहार आहेत की या बाबतीत प्रयागशी कोणी मुकाबला करूच शकत नाही. त्यातून आज तर वसतपचमी. सगळे लोक गेलेत सगमावर बुडी मारायला.

'पण वॉचमन, प्यून, कॅशियर सगळे गेलेत?' मी विचारतो. मुंबई-पुण्याकडे राहिलेल्या माझ्या मनाला अजून हा प्रकार पचत नसतो, पटत नसतो.

'कौन रोक सकता है भाई इनको, कॅज्युअल लीव्ह मार देते है और गायब हो जाते है'

'अस नाही व्हायला पाहिजे. त्यातून तुझी ब्रँच तर रस्त्यापासून बरीच आत आहे. आले तीन चार गुड आणि ५–५० हजाराची कॅश पळविली तर तू एकटा काय करणार? खर पाहिले तर तू सुद्धा बँक बद करून घरी जायला पाहिजे होते, एवढी रिस्क कशासाठी पेलतो आहेस?' मी विचारतो.

पुन्हा मिशाचो तशीच हालचाल होते. डोळ्यातील चमक वाढते छाती रुदावते आणि उत्तर येते.

'देखिये साब मैं तो यहाँका सबसे जिम्मेदार अफसर हूँ! माझ्यावरच्या भरवशावर माझ हेडऑफीस निवात रहात. लोकाच्यासाठी ब्रँच उघडी ठेवण्याची जबाबदारी माझी आहे. काही झाल तरी त्याला तोड देण्याची हिम्मत माझ्यात आहे. बँक बंद करून पळून जाण्याचा बेजबाबदारपणा मी करू शकत नाही. आखीर मेरी तो कोई इज्जत है!' ¤

दुपारची पाच वाजण्याची वेळ. मी शॉपमधील माझी नेहमीची राऊड सपवून आलो. काम तर ठरल्याप्रमाणे रेटीत होतो. पण तरीदेखिल मनात कुठेतरी काहीतरी चुकत असल्याची भावना उत्पन्न झाली होती. दुपारी जोडलेल्या शेलमध्ये पुष्कळच चुका होत्या. वेल्डीगला क्रॅक्स गेल्या होत्या. शॉपच्या फ्लोअरवर वेल्डीगचे इलेक्ट्रोड्स् इतस्ततः विखुरलेले दिसले होते. चारच दिवसापूर्वी झालेल्या कॉपरच्या केबलच्या चोरीचा रिपोर्ट टेबलावर पडलेलाच होता. ओव्हरड्राफ्ट कमी करण्याबद्दल आलेले बँकेचे पत्र टेबलावर पेपरवेटच्या खाली ठेवलेले होते. सात तारीख तर परवाच होती. कामगारांच्या पगाराचे बावीस हजार दोन दिवसात काहीही करून मिळवायला हवे होते. एक ना दोन. अनेक प्रश्न आ वासून उभे होते त्यातच कन्सल्टंटचा माणूस येत असल्याची तार माझ्या स्टेनोने आत्ताच वाचून दाखवली होती. मला हातपाय गाळून चालण्यासारखे नव्हते. एकेका प्रश्नाला रितसर सामोरे जायलाच हवे होते. जरा विचार करून मी साऱ्या फोरमन आणि इंजिनिअर्सची मिटीग माझ्या खोलीत पाच मिनिटात बोलावली.

सगमाकडे पहात हात बाधून विमनस्क उभा होतो. एक एक करीत

सारी मंडळी येऊन बसली. सुरुवातीपासूनच मी आक्रमक धोरण स्वीकारले. शॉपमध्ये दुपारीच पाहिलेल्या चुकाचा व अव्यवस्थितपणाचा पाढा वाचला. अनेक प्रश्न सटासट सर्वांच्या तोंडावर फेकले. उत्तराची अपेक्षा नव्हती व तशी कोणाची हिंमतही नव्हती. प्रश्नाची उत्तरे न आल्याने मी मनोमनी जरा सुखावलो. नकळत माझा इगो पोसला गेला. कोणाकडून कसलाही खुलासा न आल्याने काम कसे व्हायला पाहिजे याबद्दलचे उपदेशामृत मी सर्वांना पाजू लागलो. बोलता बोलता मी पूर्वी काय केले, कसे केले, आताच्या इजिनिअर्समध्ये कशी रंग नाही त्याचेही वर्णन केले सहज चाळा म्हणून माझ्या टेबलावर ठेवलेला ४" × ४" आकाराचा मोठा लोखडाचा ठोकळा उचलला व आमच्या वेळी कॉलेजमध्ये तो छिन्नी हातोडीने कसा तोडायला लावीत त्याचेही वर्णन केले. तुमच्यापैकी कोणीही हे करू शकणार नाही. कारण त्याला हाताने काम करण्याची सवय लागते म्हणूनही सुनावले. सारी मंडळी एकूणच वातावरणाच्या दबावाखाली शांत बसली होती. चहा सपवून एकेक करीत सारेजण चालले होते.

घरी कोणीच नव्हते, त्यामुळे घरी जाण्याचा प्रश्नच नव्हता. कारखान्यातून परस्पर बोटक्लबवर गेलो. एक रोबोट घेतली. चांगले दहा पंधरा मिनिटांचे स्प्रीट रोवीग केल्यावर जरा बरे वाटले. चांगला तासभर नदीत इकडे तिकडे उगाचच भटकलो क्लबवर येऊन कॉफी घेतली. आणखी अर्धा तास असाच क्लबवर रेंगाळत काढला आणि गाडी घेऊन घरी निघालो. पुलापाशी आलो तर शॉपमध्ये उजेड दिसला. गाडी बाजूला उभी केली आणि दारावर जाऊन वॉचमनकडे चौकशी केली. वॉचमन म्हणाला की, आत रिसबूडसाहेबांशिवाय तर कोणीच नाही. माझे कुतूहल आता चांगलेच जागे झाले होते. हळूच दार उघडून मी आत गेलो. पहातो तो माझ्या टेबलावरचा ४" × ४" चा लोखडी तुकडा शेगड्यात पकडला गेला होता. शेगड्याशेजारी ४–५ छिन्या शेवटून ठेवलेल्या होत्या. खाली लोहाराची भट्टी पेटलेली होती व शेजारी मोठा anvil होता. त्यातीलच एक छिन्नी घेऊन रिसबूड त्या चौकोनी तुकड्यावर बाजूने ठणाठण घाव घालीत होता. सारी हालचाल अत्यंत शिस्तबद्ध चालू होती. छिन्नीची धार गेली की भट्टीत घालून स्वतःच शेवटून घेत होता. मी ते दृश्य पहात पधरा वीस मिनिटे थांबलो व नतर भैय्याला रिसबूडपाशी काहीएक न बोलण्याची सूचना देऊन निघून गेलो.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागावरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागावरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**


दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे सकाळी आठ वाजताच रिसबूडने त्याच हसऱ्या चेहऱ्याने मला विश केले. कालचा त्याचा जॉब कसा काय झाला, म्हणून विचारण्याची उर्मी मी मनात तशीच दाबली. तो आपणहून सांगतो का पाहू, असा मी विचार केला. नेहमीप्रमाणे राऊंड मारली. कालच्या चुका बऱ्याच सुधारल्या जात होत्या. इतस्तत पसरलेले इलेक्ट्रोडस जागच्या जागी ठेवले जात होते. माझे थोडेफार समाधान झाले होते. मी आपल्या खोलीत परत गेलो. खोलीत शिरतो तो तोच लोखडाचा ४" × ४" चा ठोकळा माझ्या टेबलावर त्याच कालच्या कागदावर विसावला होता. पण त्याचा आकार मात्र पुरा बदलला होता. वरून साधारण अर्धा ते पाऊण इचावर काप घेतल्याचे स्पष्ट दिसत होते त्या ठोकळ्याने जणू पुरा आ वासला होता. मी जवळ जाऊन जरा निरखून पाहिले. जॉब तर व्यवस्थित झालेला होता. नको त्या ठिकाणी घाव बसल्याची लक्षणे कोठेही दिसत नव्हती. त्याचा उघडलेला भाग करवतीने कापल्यासारखा गुळगुळीत दिसत होता. मी खुर्चीवर बसलो, घटा वाजवली व रिसबूडला बोलावणे पाठविले.

'या या रिसबूड– Job is well done, very well done. I congratulate you काल मी जरा अधिकच तापलो होतो. Please forget about that incident. तुमच्या जॉबबद्दल तुमचे कौतुक तर करायलाच हवे. अस करा आजच सध्याकाळी India woollen मधून एक छानसा पॅटपीस आणा Submit that bill to the cashier मी सूचना देऊन ठेवतो.'

रिसबूडच्या चेहऱ्यावर आश्चर्य उतू जात होत. काहीतरी बोलण्याचा प्रयत्न तो करीत होता खास, पण हवे ते शब्द बहुधा सापडत नव्हते.

'Speak up my boy–go ahead'. त्याला जरा धीर देण्याच्या उद्देशाने मी म्हणालो.

'सर, तुम्ही रागावणार नसला तर बोलतो.' अतिशय विचारपूर्वक तो बोलू लागला. डोळ्यात एकप्रकारची चमक आली. मान आपोआप वर झाली.

'सर, काल तुम्ही सर्वांच्यादेखत आमच्या इज्जतीचा पार भाजीपाला करून टाकलात. हे लोखड जर मी तोडल नसतं तर माझ्या हाताखालचे लोक मला हसले असते. मला तुमचा पॅटपीस नको आहे सर. कालचा जॉब करताना मला हे बक्षीस मिळाले त्याचा मला फार अभिमान आहे.' बोलता बोलता त्याने आपले दोन्ही पंजे माझ्यासमोर धरले. पुरीवर येतात तसे फोड टरारून आलेले त्याच्या दोन्ही हातावर दिसत होते. आश्चर्य चकीत होण्याची आता माझी पाळी होती.

'सर, तुमच्या पिढीपेक्षा आमच्या पिढीत हिम्मत, जिद्द जास्त आहे. तुमच्या पिढीने सोसले त्यापेक्षा अधिक कष्ट आज आमची पिढी करीत आहे. जीवनातील चढाओढ पूर्वी कधी नव्हती, त्यापेक्षा आज जास्त जीवघेणी झाली आहे. आजच्या पिढीची बहुश्रुतता केवळ अतुलनीय आहे. मग या पिढीने केस लाब वाढवलेले असोत, चटेरी पटेरी कपडे घातलेले असोत वा बीयर पीत असोत. सर, त्यांना न्याय द्या. त्यांची इज्जत करा.'

तिरीमिरीत तो उठून गेला. मी मात्र सुन्न बसून राहिलो. □ □

कलोपासक : सप्टेंबर

# कावळा–कावळी

**वि. भा. देशपांडे**

कलोपासकानी सप्टेंबर महिन्यात 'प्रयोग' मध्ये जयवत दळवी याची 'कावळा आणि कावळी' एकाकिका सादर केली. एकांकिकेचा जीव अगदी लहान आहे. लेखकाचा सारा भर कावळयाच्या दृष्टीकोनातून मानवी जीवन कसे आहे यावरच आहे. सपूर्ण एकाकिका कावळयांनी केलेले मानवी जीवनावरचे भाष्य आहे. काही ठिकाणी ते प्रतिक्रियात्मक आहे कावळा या शब्दाभोवती जेवढे वाच्यार्थ आणि लाक्षणिक अर्थ उपलब्ध आहेत, त्याचा लेखकाने मनसोक्त वापर केला आहे किंबहुना तो एक शब्दांचा खेळ व्हावा इतका वापर झालेला आहे. त्यातल्या शाब्दिक वापराच्या युक्तीमुळे तात्कालिक रजन होत असले तरी त्यामध्ये *नाट्यात्मकतेचा अभाव जाणवत होता.* विविध शब्दार्थांच्या उपयोजनाने एकांकिकेतील अपेक्षित उपरोधिक नाट्याशय क्षीणसा झाला.

एकांकिकेचे दिग्दर्शन शाम जोशी यांनी केले होते. सस्थेच्या पातळीवर त्यांचे हे पहिलेच दिग्दर्शन आहे. त्या दृष्टीने निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण त्यांनी आपल्या पद्धतीने एकाकिकेच्या अविष्काराचा केलेला विचार काही काही गोष्टीतून लक्षणीय रूपात जाणवत होता. विशेषत: नेपथ्याची केलेली मांडणी, मधोमध स्वयपाकघर आणि दोन्ही बाजूला लेव्हल्स देऊन उचावलेल्या खिडक्या, खिडक्यांवर कावळयासाठी केलेली जागा, एकाकिकेतील विरचनाचा परिश्रम साधण्याच्या दृष्टीने योग्य होती. कावळा–कावळीची रगभूषा आणि वेषभूषा दोन्हीही चांगली होती. कावळे खिडक्यांवर गुडघ्यावरती बसल्यावर कावळयांच्या पायासारखे काढलेले पायही लक्षवेधी होते. कावळयाच्या रगभूषेचा तपशीलात विचार केल्याची ती साक्ष होती.

कावळा–कावळीची कामे करणारे दोन्हीही कलाकार (प्रकाश–यादव–लक्ष्मीकांत ठाकूरदास) रगमचावर सहजतेने वावरत होते. चोचीची हालचालही अर्थपूर्ण करीत होते काका–काकू या पात्रांना एकाकिकेत सवाद फारच कमी आहेत. त्यामुळे त्यांच्यावर मुद्राभिनयाची जबाबदारी अधिक होती. ती जबाबदारी पेलण्यात नीलाक्षी जोगळेकर आणि अनत परांजपे हे दोन्ही कलाकार अपुरे पडले. जोगळेकर बाई तर समारभाला नेसावे इतके आकर्षक पातळ नेसून स्वयंपाकाची तयारी करीत होत्या. दिग्दर्शकाने या दोघाना प्रतिक्रियात्मक स्वरुपाच्या काही हालचाली द्यायला हव्या होत्या त्यातून अधिक नाट्य फुलले असते. किंवा या साऱ्याच पात्राना व्यगात्मक हालचाली देऊन एकाकिकेतील औपरोधिक आशय व्यक्त करायला हवा होता. सजय वझे या बालनटाने असलेली चार-दोन वाक्ये ठीक म्हटली. पण त्याच्या अनेक बालसुलभ हालचालीतून वातावरणाला जिवतपणा आणण्यासाठी उपयोग करून घेता आला असता !

एकाकिका सुरू होण्यापूर्वी शाम जोशी यांनी 'कावळयाचे सम्मेलन' या नावाचे एक छोटेसे प्रहसन वाचले. लेखन चांगले होते. त्याचे सम्पादन होणे आवश्यक आहे. ते जर अधिक नाट्यपूर्णरीतीने वाचले जाईल तर वातावरण निर्मिती होऊन पुढील एकाकिकेची रजकता अधिक वाढेल ! □


## NAVSARI OIL PRODUCTS PRIVATE LIMITED

*Registered Office & Factory :*
Maneklal Road.
NAVSARI (Gujarat State)

*Administrative Office :*
4, Rajan House, Opp. Century Bazar,
Prabhadevi, BOMBAY 25 DD.
Tele : 451550 & 456573
Telegrams : "GLYCERINE"

*Manufacturers of :*

STEARIC ACID - T. P., D. P. AND S. P. GRADES, both Distilled & Undistilled.
OLEIC ACID - DISTILLED AND UNDISTILLED.
FATTY ACIDS - DISTILLED AND UNDISTILLED OF VARIOUS OILS.
GLYCERINE - C. P. AND I. P. S.
METALLIC STEARATES - OF CALCIUM, ALUMINIUM, MAGNESIUM, ZINC AND LEAD.
NICKEL CATALYST - FOR OIL HYDROGENATION.
HARDENED OILS AND TALLOW - TO ANY SPECIFICATION.
WIRE DRAWING LUBRICANTS.

ह. शि. खरात

# सगीना

## दिलीपकुमार महातो ! साला एकदम ग्रेट !!

कलकत्ता भागातील सिलगुढीच्या आसपासच्या मळ्यातून मोलमजुरी करून पोट भरणारं एक किसान जोडप. एक दिवस जोडप्यातल्या बाप्याला पळवून नेलं जात. मारपीट केली जाते. त्यातच त्याचा अंत होतो. इकडे बाई माणूस एकटी काय करणार? काळजाचा दगड करून ती स्वतःच्या पोराला टाकून परागंदा होते. आईबापाच काय झाल हे पोराला कळत नाही. त्याला एक जाणवत असत आणि ती म्हणजे त्याच्या पोटातली भयकर भूक. पोटात हजारो अग्नीचा भडका व्हावा आणि त्यांच्या ज्वालानी आतडी कुरतडून खाल्ली जावीत असं त्या बच्च्याला वाटत होत. तेवढ्यात एक कुत्र तोडात मासाचा तुकडा घेऊन त्याच्या समोरून जात. बस्स् ! पोराला काय वाटल कुणास ठाऊक ! भला मोठा धोंडा त्या कुत्र्याच्या पेकटात घालून तो मासाचा तुकडा ते हस्तगत करत. पोटाच्या आगीत तो मासाचा तुकडा पडल्यावर त्याला हायस वाटतं. ह्या जळत्या अनुभवानं ते पोरगं एकच शिकत. बेटा ! कुछ पाना हो तो मार के ले, पीट के ले ! बस्स् ! हा पहिलाच धडा त्या पोराला हिमतीन जगायच कसं ते शिकवून गेला. त्या दुर्दैवी गरीब पोराचं नाव असत सगीना महातो !

सगीना महातो ! झाला एकदम कडम, फालतू माणूस. एक नबरचा वंडलबाज. दारूबाज, हा पक्का दारूबाज. गुंडा ! वस्तीचा दादा ! पण हे सारं इतरांना. त्याच्यावर खुन्नस असणाऱ्या चोराना. मात्र ज्यांनी सगीना महातोला ओळखलं त्यांना सगीना म्हणजे एक खुल्या दिलाचा मस्त माणूस. लेकिन उसको पहिचाननेवाला चाहिए ! उसके दिलमे घुसनेवाला चाहिए. ज्याने त्याला जाणल, ओळखल तो सगीनाला आपला बाप मानील. त्याला देव मानील. एक प्रचड शक्ती मानील.

तस पाहिल तर सगीना तसा दारूबाज बाटली मारून खुशाल डोगरदऱ्यातून गाणी म्हणत भटकणे, नाही तर ढोल वाजवीत घुमणे हा त्याच्या आवडीचा धदा. एका खासगी रेल्वे कपनीत नोकरीला. पण ड्यूटी संपली की बाटली मारून निसर्गरम्य वस्तीत भटकेल. त्या कामगार वस्तीतच तो लहानाचा मोठा झालेला. मोठा झाला तरी त्याचा अल्लडपणा अजून जात नाही. पोरांच्यात पोराहून पोर होईल तर वृद्धाच्यात गुरू नावाच्या एका ज्येष्ठ कामगाराला मान देईल. दारूच्या धुनकीत एखाद्या छबेलीची छेड काढील. पण मनातून कसा स्वच्छ असायचा. त्याला असा हिरव्यागार दऱ्याखोऱ्यात गाणी म्हणत फिरताना पाहिला की रानगीत गात झुळझुळ वाहणाऱ्या एखाद्या छबेल्या रानझऱ्याची याद यावी. इथल झाड न् झाड अन् पाखर त्याला ओळखायची. मग वस्तीतल्या माणसांची काय कथा. ढोल तर असा ठेपीत वाजवायचा की सुनते रहना. एखादं गिरेबाज पाखरू नव्यानं वस्तीत आलं तर त्याच्या ह्या ढोल वाजविण्यावर दिल ओवाळून टाकील अन् जाता जाता म्हणेल, क्या खूब बजावत है !

सगीना सरळ साधा अनपढ माणूस. अन्यायाची जबरदस्त चीड असणारा. उमद्या दिलाचा. माणूस अनपढ असला तरी गोऱ्या सायबाला घाम आणायचा. अख्ख्या वस्तीत उस्ताद म्हणून ख्यात पावलेला हा चागल्या दिलाचा दादा. काय टाप लागून गेलीय त्याच्याशी दोन हात करण्याची. दादा असला तरी स्वकीयाशी दादागिरी नाही. मात्र एखादा बदमाश निघाला तर त्याची खोपडी फोडलीच. कुणी बाईवर हात टाकला तर सगीना त्याची वाट लावीत असे. मग तो गोरा सायब असो नाहीतर कपनीचा मॅनेजर असो. म्हणूनच तिथल्या लोकाना तो केवढा आधार वाटायचा. परका प्रवासी सगीनाची चौकशी करायला आला तर तिथला वस्तीकर म्हणे माझ्या बापाचा पत्ता माहीत नाही अस कस होईल. अर्थात झिंगलेला तो वस्तीकर चारही दिशाना बोट करून सगीना सगळीकडेच आहे असे सुचवील. सगीना मनाचा सरळ असला तरी तोडाचा फटकळ होता. तो जनावरासारख बोलेल पण जनावरासारख वागणार नाही. सायेब हुशारी दाखवायला लागला तर त्याचीही आई-बहीण काढायला भीत नसे. एखाद्या फॅसिस्ट युनियनवाल्याने त्याला जबरदस्तीन जगलात आणल तर तो म्हणेल, कारे बाबा मी काय तुझ्या आईला की बहिणीला पळवून नेलय. गोऱ्या साहेबाने वस्तीतल्या मुलीवर बलात्कार केला तर त्याला विचवासारखा ठेचील. परंतु तोडावर सागेल की त्या सायबाच्या मडमेबरोबर झोपल्याशिवाय हा अन्याय दूर होणार नाही. त्याला डर कसलीच नाही. गुन्हा केला तर कबूल करील. एखाद्या पोरीची छेडछाड केली तर सागेल सगीना काही गुहेत जन्माला आला नाही. तो काही साधुसत नाही. तुमच्यासारखाच माणूस. पण खुल्लमखुल्ला वागेल. तुमच्यासारखा लपून छपून चारसोबीसी करणारा नाही. असा हा उमद्या दिलाचा माणूस कामगाराचा हिरो होता. कामगाराची ती प्रचड शक्ती होती. त्याच्या इशाऱ्यावर कारखाना बद पडे किंवा चालू होई. सगीना महातो कामगाराचा जीव की प्राण होता. त्याच्या घामाच्या एका थेंबासाठी तिथला कामगार आपला 'खून बहाने के लिये' तयार होता.

अशा ह्या सगीनाला काही पोथीनिष्ट युनियनवाले कामगार पुढारी आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करतात. सगीना ही कामगाराची प्रचड शक्ती आहे हे जाणून त्याला लीडर करतात. आपल्या सघटनेत त्याला ओढून त्याला बकरा करतात. आपल्या फॅसिस्ट चळवळीसाठी त्याचा उपयोग करतात. त्यासाठी त्याला वेलफेअर ऑफिसर करतात. एक सुदर छोकरी त्याची

सेक्रेटरी होते. कलकत्त्याला हरताळ जोरदार व्हावा म्हणून त्याला नेतात इकडे त्याच्या वस्तीची वाट लागते. लोक अन्नाला मोताद होतात. सगीनाला युनियनवाल्यांची ही बदमाशी कळते. तो प्राण पणाला लावून फॅक्टरीच सरक्षण करतो. कारण तो फॅक्टरीला आपली आई मानतो. काही फॅसिस्ट ती उडवू बघतात. त्यात त्याना सगीनामुळे अपयश येते म्हणून त्यालाच गद्दार ठरवून फासाला देण्याचा प्रयत्न होतो. परतु सच्चा कार्यकर्त्यामुळे तो वेत फसतो. पण त्यासाठी एका सच्च्या कामगार नेत्याला बळी जावे लागते.

सगीनाच्या रूपान बऱ्याच दिवसानी एक सच्चा माणूस हिंदी पडद्यावर जिवतपणे साकार झाला आहे आणि हा जिवत माणूस जिवतपणे साकार करण्याच सार श्रेय आहे दिलीपकुमारलाच. दिलीपकुमारने आपल्या कसदार अभिनयाचा एक वेगळाच पैलू पेश करून आतापर्यंतच्या त्याच्या अभिनयावर कळस चढविला आहे. फारा दिवसानी अशी अस्सल अदाकारी बघायला मिळणे आणि तीही हिंदी चित्रपटात म्हणजे फारच कठीण. पण दिलीपकुमारने आपले सारे कसब पणाला लावून एखादी भूमिका अक्षरशः जगणे म्हणजे काय हे दाखवून दिले आहे. सवादाची जबरदस्त फेक करावी ती दिलीपकुमारनेच. आपण त्याला मानतो. वर्षातून एखाद्याच चित्रपटात तो काम करील पण त्या चित्रपटाच सोनं करून टाकील. इतक्या समर्थ ताकदीचा अभिनेता सध्या तरी हिंदी चित्रपटात नाही. फिल्मी इन्स्टिटयूटमध्ये अभिनयाचे धडे घेणाऱ्यानी दिलीपकुमारपासून थोडेतरी शिकावे. अर्थात अभिनय काही शिकून येत नाही. तो जन्मजात असावा लागतो. ह्याची प्रचिती दिलीपचा अभिनय पाहिल्यावर येते. सवादाच्या एका फेकीत तो काळजाला जाऊन भिडतो.त्याच्या हुकारालासुद्धा केवढे वजन येते. बर, सवादही सारे स्वच्छ व शब्दोच्चार पूर्ण असणारे. आपल्या सुधीर फडकेसारखे. आपल्या अभिनय कौशल्याने सगीना जिवंतपणे उभा करून हिंदी चित्रपटास 'कॅरेक्टर' ही चीज काय असते हे दाखवून दिले आहे. दारुबाज सगीना, छेडछाड करणारा सगीना, रागाने पेटलेला सगीना, गरिबीची जाण असणारा सगीना, साहेबाला सुनावणारा सगीना, दारू प्याल्यावर नाचणारा सगीना, चूक झाल्यावर ढसढसा रडणारा सगीना, स्त्रीची कशी समजूत काढावी म्हणून वैतागून केस फिसकरणारा सगीना, कामगाराच्याबरोबरच कपनी विषयी ममता असणारा सगीना, युनियन नेत्यानी फसविले म्हणून बेभान झालेला सगीना—अशी अनेक बहारदार रूपे दिलीपकुमारने अशी पेश केली आहेत की, बघत राहावे. साहेब झाल्यावर तो जे चालतो त्याने खूप मजा येते. तसेच दुडक्या चालीत तो रेलगाडीबरोबर असा काही पळतो की तो शॉट पुन्हा पुन बघावा असा आहे. (झोर्बा दि ग्रीक ह्या इग्रजी चित्रपटातही अॅन्थनी क्वीन असाच गाडीबरोबर पळाल्याचे आठवते. चूकभूल द्यावी घ्यावी) आपल्या नाकाखाली बोट फिरवून छदमीपणे बोलण्याची किंवा डोके गरम झाले तर केस विस्कटण्याची त्याची लकब बघून घ्यावी.

सगीना केवळ दिलीपकुमारच्या जिवत अभिनयामुळे पुन्हा पुन्हा बघावासा वाटतो. दिलीपकुमार सोडला तर बाकी सगीनात इतर हिंदी चित्रपटासारखाच पण अल्प असा मसाला आहे. कथा मुळात समर्थ व आशयगर्भ आहे. परतु हिंदी चित्रपटाचा शाप तिला भोवल्याने बऱ्याच सांकेतिक व नेहमीच्याच गोष्टी आहेत. मारामारी, नाचगाणी, दोन बलात्कार, नायक दारुबाज गुंडा, श्रीमत बापाची मुलगी कामगार कार्यकर्ती (वरेरकरांच्या कादबरीतल्यासारखी) वगैरे गोष्टी आहेत. ही श्रीमत पोरगी जगलात भूमिगत झाली तरी नखाना नेलपॉलिश लावायला विसरत नाही. नेहमीप्रमाणे बापासमोर नायकाचा अपमान, सत्प्रवृत्त कामगारनेत्याचा बळी, लुच्चा कामगार नेता वगैरे गोष्टी चाकोरीबद्ध आहेत.

दिलीपकुमार सोडला तर अपर्णा सेन ह्या नटीने तिच्या भूमिकेला न्याय दिला आहे. सायराबानूपेक्षा ती दिसतेही छान. सेक्रेटरी म्हणून ती शोभून दिसते.

ह्या चित्रपटाचा काळ १९४२–४३ असा दिला आहे. परतु तसे वातावरण कुठेच दिसत नाही. त्यातली माणसे, गोरे साहेब, पोशाख, साड्या सध्याच्या वाटतात. विशाखाच्या बापाच्या बारमध्ये चक्क दलालचं पेन्टिंग लावल आहे. एखादा तरी गोरा साहेब हॅटपॅटमध्ये दाखवायचा. सगीताच्या बाबतीत सुरुवातीचे बर्मनदाच्या सुरातले 'छोटे छोटे सपने' व लता, किशोरचे 'तुमरे सग तो रैन बितायी' हे गाणे सोडले तर बर्मनदानी निराशाच केली आहे. तरीही सगीना पुन्हा पुन्हा बघावासा वाटतो तो दिलीपकुमारसाठी. हिंदी चित्रपटातील एक ग्रेट अॅक्टर म्हणून! साला एकदम ग्रेट!! □ □


Phone : 458270

**BC**

**BUILD-AGE CORPORATION**

DESIGNERS □ BUILDERS □ CONTRACTORS

Nav-Prabhat Chambers, 2nd floor, Room No. 5
Ranade Road, Dadar, BOMBAY 400028

Satish S. Gupte

## साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

२८-९-७४ ते ४-१०-७४

### कुंभ-व्यक्तींना गाजवणारा आठवडा

या आठवड्यात अगर त्याच्या आसपास केंद्रीय मंत्रीमंडळात आणि महाराष्ट्र राज्याच्या मत्रिमळात काही महत्त्वपूर्ण बदल, खातेबदल होण्याची शक्यता आहे. ज्याचे लग्न अगर रास कुंभ आहे, ज्याचे लग्न अथवा रास तूळ आहे, अगर या दोन्ही राशी ज्याच्या नावाशी निगडीत आहेत त्या लोकांना सन्मानाचे एखादे पद मिळाल्यास आश्चर्य वाटू नये. यापैकी सध्याच जर कुणी एखादे शासकीय पद भोगीत असेल तर त्याला बढती मिळणार आहे. कॉंग्रेसमधील या राशीच्या व्यक्तींना मंत्रिपदाचा लाभ होऊ शकेल. स्मगलर्सच्या बाबतीत व काळाबारवाल्याबद्दल अजून काही वटहुकूम अगर कडक कारवाई होईल, लोकाचा असतोष कमी होईल. या आठवड्यात पुण्याचेही नाव गाजेल. पुण्यातील एखादा राजकीय नेता मंत्री होण्याची शक्यता नाकारू नये.

### मेष : विरोधक नमतील

तुमच्या विरुद्ध कटकारस्थाने करण्याची सध्या तरी कुणालाच हिंम्मत होणार नाही. राशीस्वामी मंगळ आणि रवी विरोधकाचे सारे मनसुबे मोडून काढायला तयार आहेत. मात्र नोकरीत वरिष्ठांची मर्जी बिघडणार नाही याची काळजी घ्या. तुमचे हक्क अगर अधिकार कितीही योग्य असले तरी त्याची मागणी करायला सध्याचा काळ अनुकूल नाही. थोडी वाट पहाणे हिताचे ठरेल. पैशाची कामे होतील. गरज भागेल. रेस, लॉटरीच्या नादी लागू नका. सन्मार्ग चोखाळा. चार पैसे मिळतील. वाङ्मयात प्रगती होईल. महिलानी घरगुती उद्योगात नव्या योजनाचा वापर करावा. फायदा होईल.

### वृषभ : स्पर्धेत बक्षिस

या आठवड्याची सुरुवात अतरिक्षातील शीतल चद्राच्या सुखद स्पर्शाने होत आहे. तुमचे मन आणि त्यामुळे तुमचे शरीर सुदृढ ठेवण्याचे काम हा चद्र करणार आहे. अनेक प्रकारच्या मानसिक आजारातून यावेळी तुमची सुधारणा होणार आहे. तुम्ही वरिष्ठ पदाच्या नोकरीची परीक्षा दिली असेल तर त्यात तुम्हाला नेत्रदीपक यश मिळणार आहे. चित्रपट, नाटक, सगीत इत्यादी स्पर्धांत हेवा वाटावा असे यश तुमच्या पदरी पडेल. नोकरी धद्यातील, कलाक्षेत्रातील तुमच्या आशा आकाक्षा साकार होऊ शकतील. महिलानी ससारात योजनाबद्ध उपक्रम हाती घ्यावा.

### मिथुन : ईश्वरचिंतन करा

एका बाजूला बारावा केतू तर दुसऱ्या बाजूला सहावा राहू आणि एवढे पुरेसे नाही म्हणूनच की काय सुखस्थानात रवी मगळाची जोडी तुमच्या मनाचे सुख हिरावून घेत आहेत. मनाची स्थिती यावेळी गोधळाची राहील. भावनेवर सशयाचा पगडा बसेल. अविचाराने तुमची विवेकशक्ती वादळात सापडल्यासारखी होईल. अशा वेळी पैशाच्या कोणत्याही व्यवहारात काळजी घेणे आवश्यक आहे. नोकरीत कुणालाही दुखवू नये. नवीन बदल पुढे ढकलावा. महिलानी भांडणाचा प्रसंग येऊ देऊ नये. शेजाऱ्याबरोबर स्नेहाने वागावे.

### कर्क : स्थावराची प्राप्ती

शनीच्या साडेसातीकडे दुर्लक्ष न करताही तुम्ही या सप्ताहात मोठे धाडस करायला मुळीच हरकत नाही. तुमचा जर स्थावराचा वाद सुरू असला तर तो तुमच्यासारखा होईल. तुम्हाला जर जमीन खरेदी करायची असेल तर हा सप्ताह अनुकूल आहे. सोमवार ते गुरुवार या मुदतीत नोकरीत प्रमोशनचा योग आहे. धद्यात नवीन भाडवल गुतवण्याची योजना सफल होईल. व्यापार जपून करा. प्रवासात थोडा अडथळा. महिलानी नोकरीत नवे कर्तृत्व दाखवावे. चीज होईल.

### सिंह : प्रवासाचा योग

या आठवड्याची सुरुवातच तुमच्या प्रवासाच्या आवडीने होणार आहे. विशेष कारणाने तुम्ही परदेशी जायला उत्सुक आहात जणू ती तुमची महत्त्वाकाक्षाच आहे. मित्र हो, आठवड्यात याबद्दल तुमचा मार्ग 'क्लिअर' होईल. सर्व प्रकारची पूर्व तयारी होईल. सर्वसामान्य आठवडा चागला आहे. नव्या ओळखी होतील. राजकारण, समाजकारण, कला-वाङ्मय या क्षेत्रातील व्यक्तींचा परिचय होईल. पैशाची चणचण कमी होईल. चालू धद्यातील मदी ओसरत असल्याचा अनुभव येऊ लागेल. महिलांनी सार्वजनिक कार्यात हिरीरीने भाग घ्यावा.

### कन्या : सुधारणेत वेग

तुम्ही आपले मन जेवढे स्वच्छ ठेवाल, जेवढे प्रसन्न ठेवाल तेवढे तुमचे आरोग्य सुधारणार आहे. गतकाळातील अडचणीचा बाऊ आता करीत बसू नका. एकटे रवी-मगळ तुमच्या सर्व आशा आकांक्षा पूर्ण करणार आहेत तुमच्या बुद्धीला व कर्तृत्वाला उजाळा मिळणार असून नव्या क्षितिजाचे दर्शन घडणार आहे. नोकरीत त्रास कमी होईल व नवे आवडते काम मिळेल. एखादा नवा उद्योग सुरू होईल. आर्थिक स्थिती सुधारण्याच्या नव्या योजना दृष्टिपथात येतील. महिलांनी धाडस करून लघुउद्योग सुरू करावा.

### तूळ : अफाट खर्च

मित्र हो, रवी आणि मगळ हे दोन ग्रह बारावे आहेत म्हणून तसे तुम्हाला घाबरून वा गागरून जाण्याचे कारण नाही. गुरू रक्षण करायला बसला आहे. तो तुमचे राजकीय, सामाजिक व औद्योगिक कार्य उचवायला, तुमची प्रतिष्ठा वाढवायला तयारच आहे. फक्त तुम्हाला जपायला हवे

ते थोडेफार तव्येतीला. त्याहीपेक्षा अनपेक्षित रीत्या होणाऱ्या अफाट खर्चाला. महिलांनी दागदागिन्यांच्या प्रदर्शनाचा हव्यास सोडावा. बाहेर जाताना सावधगिरी बाळगावी.

### वृश्चिक : नातेवाईकांची मदत

हर्शलसारखा 'अकल्पित' सामर्थ्याचा ग्रह तुम्हाला बारावा आहे. याचे अवधान मुळीच सोडू नका. फसवणूक, चोरी, हरवणे अशा मार्गाने तुमचे पाकीट रिकामे होणार नाही याची डोळ्यात तेल घालून काळजी घ्यायला हवी. पण त्याहीपेक्षा पाकीट कुणी मारणार नाही याची दक्षता अधिक घ्या. या आठवड्यात चंद्र व शुक्र तुम्हाला अनुकूल आहेत. त्यामुळे तुमच्यावर आजपर्यंत नाराज असलेले तुमचे नातेवाईक पुन्हा तुमचे गुणगान गाऊ लागतील. तुम्हाला उद्योगव्यवसायासाठी मदत करतील.महिलानी अनुकूल ग्रहांचा कौशल्याने उपयोग करावा.

### धनू : नोकरीत अनुकूल

वृश्चिक राशीत ठाण मांडून बसलेला बारावा राहू अजून काही काळ तरी तुमचे शारिरिक आरोग्य सुधारू देणार नाही. विशेषतः रक्ताच्या दूषिती करणाचे आजार अधूनमधून शरिरात वाट फुटेल त्या मार्गाने बाहेर प्रकटतील. पण एवढा अपवाद सोडला तर तुम्हाला आता कुरकूर करायला मुळीच जागा नाही. नोकरीत यापूर्वी प्रतिकूल स्थलातर घडले असेल तर आता अनुकूल घडेल. तुमचा मुद्दाम घसरलेला दर्जा पुन्हा, प्राप्त होईल. विरोधकांना तुम्ही चागलीच धूळ चारू शकाल. महिलांनी वरिष्ठांवर फारसे रागावू नये. नुकसान होईल.

### मकर : संधीचा लाभ घ्या

खरे म्हणजे रवी-मगळ भाग्यस्थानी विराजमान झाल्यापासून तुमच्या भाग्यचक्राला सूर्यरथाचा वेग आला आहे. तुम्हाला कुरकुरायला मुळीच जागा नाही. आता तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा व तुम्ही बांधाल ते तोरण असेच तुमचे ग्रहमान आहे. तुमच्या कर्तबगारीचा वैभवशाली इतिहास तुम्ही निर्माण करू शकाल. वाड्मय, राजकारण, समाजकारण, पैसा, नोकरी, व्यापार, कारखानदारी इत्यादी कोणत्याही क्षेत्रात तुम्ही असा, तुमच्या कर्तृत्वाला तोड राहाणार नाही. महिलानी नोकरीत आस्था दाखवावी. चीज होईल.

### कुंभ : अचानक प्रवास

हा आठवडा तसा बरा आहे. तुम्ही कसलेही प्रयत्न करायला हरकत नाही. जे तुमच्या मनातदेखील कधी आले नाही तेच मोठे 'घबाड' तुमच्या अकस्मात हाती आले तर तुम्ही अवाक् व्हाल. एखादी सरकारी उच्च प्रवासाची तुम्हाला अशी काही संधी मिळेल की, 'हे कसे?' अशाच कोड्यात तुम्ही पडाल. राजकारणात तुमचा वरचश्माच राहील. कुणाचे तरी पद हिरावून घेतले जाईल व ते तुम्हाला दिले जाईल. सत्ता हाती चालत येईल. महिलांना काही मोठा लाभ पदरात पडेल. पैसा मिळेल.

### मीन : मतभेद टाळा

सातवे स्थान जेव्हा दूषित होते तेव्हा प्रामुख्याने पती-पत्नी यानी एकमेकाना जास्तीत जास्त साभाळून घेतले पाहिजे. कारण दुष्ट ग्रह प्रथम आघात करतात ते ससारावर. अशीच परिस्थिती सध्या तुमच्या बाबतीत निर्माण झाली आहे. म्हणून पतिपत्नीपैकी कुणीही एकमेकाबद्दल संशय निर्माण होईल असे वागू नका. कुणाच्याही टीका लक्षात घेऊ नका. नोकरीत वरिष्ठाच्या कलाने घ्या. प्रमोशन, पैसा, बदली इत्यादी काही मागू नका. पैसा जपून वापरा. महिलानी–विशेषतः कुमारिकानी 'प्रेम' करू नये. फसगत होईल.

☐ ☐

**BANCO CHEMICALS**

**Anand Deep Chembers,**
**Narsi Natha Street,**
**BOMBAY - 3**

# गौतम बुद्धाला जेथे साक्षात्कार झाला ! : पृष्ठ ८ वरून

वस्तीपैकी १० लाखाच्या आसपास आदिवासी असतील. छोटा नागपूरमध्ये सुमारे ५० ते ६० लाख आदिवासीची वस्ती आहे. आदिवासीची अवस्था फारच वाईट होती– आहे. जेथे रस्ता पोचला आहे अशी ठिकाणे सोडली तर अन्य ठिकाणच्या विशेषत: जगलात खोलवर पसरलेल्या आदिवासीनी अजूनपर्यंत मोटार पाहिलेली नाही, रेल्वे पाहिलेली नाही. अजूनही हे लोक नगेच राहातात. आपल्या सारखा भात डाळ शिजवून खाण्याची त्याना माहिती नाही. अजूनही मास भाजून खातात. शिक्षण नाही. गरिबी तर कमालीची. नरबळी देण्याची प्रथा याच्यात अजूनही काही ठिकाणी आहे.

आजही यांची अवस्था वाईट आहे. शेती केली तर हत्ती नासधूस करून पीक फस्त करतात. आणि कद खायला सरकारची परवानगी नाही. अशा कचाटयात सापडले आहेत. आजही दोन वेळा खायला द्या. या मागणीसाठी त्याना सत्याग्रह करावा लागतो आहे. खायला न मिळाल्याने दरोडेखोरीही आता ते करू लागल्याच्या बातम्या गेल्या ८–१० दिवसात आल्या आहेत.

कोणीच आदिवासीसाठी खटपट केली नाही. एक झारखंड पार्टी आहे. पण नेहमी वेगळे झारखड राज्य मागणे या पलीकडे त्यानी काहीच केले नाही. वेगळया विदर्भवादी चळवळी सारखाच काहीसा प्रकार. आदिवासीचे पुढारी भ्रष्ट आहेत. बाई आणि बाटलीचा मोह त्याना बरबाद करून बसला आहे. आदिवासीच्या मतावर विधान-सभा, लोकसभा गाठायची, स्वत.ची तुबडी भरायची आणि नंतर काहीच करायचे नाही हा खाक्या त्यानी चालविला आहे.

त्यामुळे आदिवासी विकासापासून वचीतच राहिले आहेत.

शिक्षणाचा प्रभाव व सरकारी दडपशाही याचा मोठा परिणाम आदिवासी मनावर झाला आहे. विहारमधले चालू असलेले आदोलन अतिमतः आपल्याच फायद्याचे आहे हे त्याला कळत नाही. एकाद्याला कळले तर सरकार विरोधी जाण्याचे मानसिक बळ त्याच्यात असत नाही. आणि दोहोतून एखाद्या अपवादात्मक माणसाची सुटका झालीच तर मग झारखंडच्या प्रचाराच्या तडाख्यात तो सापडतो. अशा या कारण मालिकेमुळे आदिवासीचा फारसा सहभाग या आदोलनात झालेला नाही. त्यातून पुन्हा कम्युनिस्टांचा ताप आहेच. जमेल तेथे आपल्या झेंडयाखाली त्यांना सघटित करून एखादा इंदिरा विरोधी लुटपुटचा मोर्चा ते काढीत असतात.

या सर्व घटकापासून दूर असे काही भाग आहेत. पलामूचा त्यात अंतर्भाव होईल. लतिहार या पलामूतच्या एका गावात हायस्कूलच्या मुलीनी मोर्चे काढले. गावात कॉलेज नसल्याने शाळकन्यानीच छात्र-सघर्ष समिती चालवली आहे. या मुलीचे सामान पोलिसानी वसती-गृहातून बाहेर फेकून दिले. पण तरीही मुली आदोलनात आघाडीवर आहेतच.

डाल्टनगज शहरातही परीक्षा व कॉलेजवर बहिष्कारात आघाडी-वर राहिले आदिवासी विद्यार्थी. त्यांनी १०० टक्के भाग घेतला. या विद्यार्थ्यांना आणि लतिहारमधल्या विद्यार्थीनीना मिळणाऱ्या सवलती काढून घेतल्या जातील अशा धमक्या सरकारने दिल्या. तरीही कोणीच सरकारचे ऐकले नाही.

आदिवासीनी लढयात यावे यासाठी जयप्रकाशनी एकदा प्रयत्न केला. पण नीटसे जमले नाही. आता पुन्हा एकदा आदिवासीच्या नेत्यांशी बोलण्याचा प्रयत्न होणार आहे. त्यांची वेगळया झारखडची मागणी मान्य केली जाणार नाही; फार तर त्यांनी झारखंड सघर्ष समिती अशा नावाने काम करावे अशी सवलत त्याना देण्यात आली आहे. सघर्ष समितीचे कार्यकर्ते आदिवासी खेडयांपर्यंत अजून मना-पासून गेलेलेच नाहीत. त्यानी मेहनत घेतली तर असहाय्य आदिवासी निश्चितचपणे लढयात येतील.

डाल्टनगजमध्ये जनसघर्ष समिती आहे आणि छात्रसंघर्ष समितीही आहे. पण सघटना मात्र व्हावी तशी झालेली नाही. थोडी ढिलाई आहे. आता ठाकूरदास बग तेथे मुक्काम ठोकून आहेत. ते काम नीट राकेला लावतील असे दिसते. गढवा येथे त्यानी एक-दोन दिवसाचे शिबीरही आयोजित केले आहे. त्यांची सघटना कुशलता आंदोलन वाढवील असे वाटते.

डाल्टनगज शहर आदोलनात पहिल्यापासून जोरकसपणे भाग घेते आहे. जनजागरणापासून सत्याग्रह सघर्षापर्यंतचे सर्व कार्यक्रम त्यानी कटाक्षाने पार पाडले आहेत.

पोलिसाची मारपीट इथेही झालीच आहे. श्री. देहाती नावाच्या माजी आमदाराला पानाच्या दुकानासमोर पकडून नेण्यात आले आणि सिनेमागृह जाळल्याचा आरोप ठेऊन बेदम मारण्यात आले. त्याचा एक हात कायमचा निकामी झाला आहे.

परीक्षेवरचा बहिष्कार इथे शभर टक्के यशस्वी झाला. दबावाला न जुमानता खुटी-गुमला-लोहरदगा या आदिवासीची बहुसख्या असलेल्या परीक्षा केद्रावरही बहिष्कार शभरटक्के होता.

पोलिसानी या सगळयाचा सूड घेतलाच. रका या आदिवासीच्या गावात जाऊन २० मार्चला पोलिसांनी धुडगूस घातला. घराघरात घुसून लोकांना बडवून काढले, भाडीकुडी उचकून फेकून देण्यात आली. धान्य उधळून देण्यात आले. एका जमादाराने तर चिडून एका माणसावर पिस्तुलाचा नेमही धरला होता. पण कोणीतरी साव-धानीने त्याच्या हातावर दडुक्याचा फटका मारल्यामुळे समोरचा आदिवासी वाचला होता.

९ ला पहाटे साडेचार वाजता गयेला जाण्यासाठी बसमध्ये बसलो. डोळयावर जबर झोप होती. पेंगत असताना शेरघाटी केव्हा आली समजलेच नाही.

बस शेरघाटी स्टॅंडमधून बाहेर आली. पोलीस ठाण्यासमोरच काही लोकानी थाबवली. आणि भराभर लोक बसच्या टपावर बसले. बसची क्षमता ५० माणसांची. पण आम्ही केवळ १५–२० लोकच आतमध्ये तिकीट काढून बसलेलो. आणि सुमारे ७५–८० ची ही जनता टपावर बसलेली. तिकिट न काढताच. पोलीसठाण्यातले पोलीस नुसते बघतच उभे होते.

बिहारमध्ये नियम, कायदा वगैरे चालतच नाही त्याला त्याचा कुठे इलाज होता ?

पावसाने रस्ते उसवून टाकले होते. खाचखळगे सांभाळीत गयेला पोचलो.

गौतम बुद्धाला इथे साक्षात्कार झाला होता म्हणे.

एस. टी. स्टँड घाणेरडा. उपाशीपोटी शेंबडी पोरे भीक मागत फिरत आहेत. त्याच्या शेंबडाने माखलेल्या तोंडावरच्या आणि चिखलाने माखलेल्या हातापायावरच्या माशाही हाकलायची शुद्ध त्याना नव्हती. हजारो माणसे दाटीवाटीने बसली होती. फाटकी-तुटकी, चिखलातच बसून अॅल्यूमिनियमच्या भाड्यातून भात कालवून खात होती. त्याच्यातूनच पाणी पीत होती. माशाची साथ सदैव होतीच.

बिहारभर या दृश्याने पाठ सोडलेली नाही. पोटात ढवळू लागले होते.

१२ एप्रिलला या गयेन पोलिसी अत्याचाराचे थैमान अनुभवले होते.

९ एप्रिलपासून आंदोलनातील धरणे-निदर्शनाची अवस्था सुरू झाली होती. अत्यत शांतपणे गयेचे नागरिक सरकारी कचेऱ्यासमोर धरणे धरून बसले होते.

१२ तारखेला नेहमीसारखेच शाततापूर्ण धरणे सरकारी कचेऱ्यां-समोर चालू होते. एक अधिकारी सरकारी कचेरीत जात असताना मनोजकुमार बोस हा छात्रनेता त्या जीपसमोर आडवा पडला. त्याला अटक करण्यात आल्यावरून थोडीशी बाचाबाची झाली. पोलिसांच्या अरेरावीने चिडलेल्या जमावातून थोडीशी दगडफेक झाली. म्हणून पोलिसानी लाठ्या परजल्या. जमाव पांगला आणि नतर विनाकारण शहराच्या काही भागात पोलिसानी गोळीबार केला. कोतवाली आणि पोस्ट ऑफीसला धोका पोचेल म्हणून गोळीबार करावा लागला ही सबब सांगण्यात आली. पण त्याचवेळी पोस्टासमोर शांततापूर्ण धरणे चालूच होते.

नऊ जणांना मृत्यू आला.

के. पी. रोडवरील अमानुष कहाणी ऐकण्यासारखी आहे.

एक सीमासरक्षक दलाचा जवान होमगार्डला घेऊन गस्त घालीत होता. त्याला एकदम सणक आली. काही कारण नसताना एकाएकी त्याने गोळ्या झाडायला सुरुवात केली. अनेकांना जखमी केले, नतर एक दुकान उघडायला लावून त्या दुकानाच्या पायरीवर उभे राहून पुन्हा गोळ्या झाडल्या. आणखी दोन जण जखमी झाले. राजाराम नावाच्या एका माणसावर त्याने नेम धरला. राजारामची छोटी मुलगी त्या जवानाच्या पाया पडली. त्यामुळे त्याने राजारामला सोडले. नतर हे दोघे रस्त्यावर आले आणि जखमीना पायाला धरून फर-फटवीत हिंडवले. जखमीचे खिसे चाचपून त्यातल्या वस्तू काढून घेतल्या. पैसे घेतले. हातावरची घड्याळे काढून घेतली. नतर ते आणखी पुढे गेले. जैन मदिर रोडवर जाऊन त्यांनी पुन्हा गोळीबार केला आणि सज्जनकुमार व रघुनाथ पाडे याना ठार मारले. रघुनाथ पाडे हात जोडून सागत होता की, तो गया शहरातला नाही, त्याचा कशाशीच सबध नाही. पण जवानाने ऐकले नाही. त्याला गोळी घातली. जखमी झालेला रघुनाथ वेड्यासारखा धावत सुटला. काही


□ □ □ □ □

EASTERN
COMMERCIAL
CO.

Navsari Chember,
Outram Road,
BOMBAY - 1.

□ □ □ □ □ □

पावलावर जाऊन कोसळला होमगार्ड त्याच्या मागोमाग धावत गेले आणि त्याला लाठ्यांनी बडवून काढला. दोघांनी त्याचे पाय धरून त्याला बरेच लांबवर फरफटत नेले. गोळीच्या जखमेने आणि लाठीच्या जखमानी रक्तबंबाळ झालेल्या रघुनाथ पांडेच्या रक्ताचे फरफटलेले डाग कित्येक दिवसपर्यंत रस्त्यावर दिसत होते.

अन्य ठिकाणीही पोलिसानी असेच कर्तव्य पार पाडले होते.

प्रत्यक्षात नऊपेक्षा कितीतरी जणाचा बळी गेला असावा. पण पोलिसांच्या अत्याचारानी भयभीत झालेली त्या भागातली माणसे अजूनही तोंड उघडायला घाबरत आहेत.

हॉस्पिटलच्या दारात एक गोळी लागून तडफडून मेलेला माणूस एकाने पाहिला आहे.

हॉस्पिटलमध्ये कोणी उपचारासाठी गेला तर त्याच्यावर खटला नोंदवला जाई. या भीतीने अनेकजण हॉस्पिटलपर्यंत गेले नाहीत.

श्री. नागेश्वरप्रसाद यादव हा माणूस साक्षीदार होणार हे पाहिल्यावर त्याला पोलिसानी मरेमरेस्तोवर मारले. इतर अनेकांना असाच अनुभव आला.

जयप्रकाश नारायण यानी या हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती. तिचा अहवालही बाहेर आला आहे. अत्यंत विदारक सत्ये आणि पोलिसाचे अत्याचार त्या समितीच्या अहवालात नोंदण्यात आले आहेत. ९ पेक्षा जास्त मृत्यू झाल्याचेही त्या अहवालात म्हटलेले आहे. या भीषण अशा हत्याकांडावरील या अहवालाला वृत्तपत्रानी प्रसिद्धी दिलेली नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

हा प्रकार घडल्यानंतर जवळ जवळ पाच महिन्याचा कालावधी लोटल्यावर मी गयेत पोचलो. तरीही लोकांशी बोलताना त्यांच्या डोळ्यातली भीती जाणवत होती. लोक बोलायला तयारच नव्हते. आपण काही सांगितले तर पोलीस आपल्याला आणि आपल्या पोराबाळांना मारतील ही भीती त्यांना वाटत होती.

'आज जो कोणी बाहेर येईल त्याला बंदुकीने मारण्यात येईल' असे गोळीबारापूर्वी अधिकारी सांगत फिरत होते. आज त्या भागातली लहान पोरे खेळतानाही पोलीस चोर खेळ खेळायच्या ऐवजी संचारबंदीचा खेळ खेळताना तीच घोषणा नक्कलतात. इतका खोल परिणाम झालाय त्यांच्या मनावर.

गयेच्या हत्याकांडावर सरकारने मौन पाळले आहे.

इंदिरा गांधी आणि गफूर इतके बेशरम होऊशकतात ?

गयेहून येताना जहानाबादला थांबलो.

५ तारखेला जहानाबादला जगदेवप्रसादचा खून झाला होता.

जगदेवप्रसाद हा शोषित दलाचा नेता. संविद मंत्री मंडळातला एक माजी मंत्री.

५ तारखेला दुपारी १२ वाजता कुर्था ब्लॉक ऑफीससमोर निदर्शने चालली होती. जगदेवप्रसाद त्या निदर्शनाचे नेतृत्त्व करीत होते. निदर्शने उग्र होती. जगदेव स्वत:ला अटक करवून घ्यायला तयार होता.

पोलिसाच्या म्हणण्यानुसार पोलीस व तहसीलदारावर खूप दगडफेक झाली. आणि नाइलाजास्तव गोळीबार करावा लागला.

पण वस्तुस्थिती तशी नाही असे तेथे हजर असणारे सांगतात.

निदर्शने चालू असताना थोडीशी दगडफेक झाली. पण जगदेवजींनी त्यांना शांत केले; दगडफेक थांबवली. आणि ते परत येत असतानाच तहसीलदाराने 'फायर: फायर:' असा हुकूम दिला. ज्याच्या हातात रायफल होती त्याने रायफल चालवण्यास नकार दिला. तरीही फायर फायर असा हुकूम येतच राहिला इतक्यात सी. आर. पी. चा एक इन्स्पेक्टर धावत आला. उत्तर प्रदेशचा होता तो. त्याने त्या पोलिसाच्या हातातून बंदूक हिसकावून घेतली. पद्धतशीर पोझ घेतली आणि जगदेवबाबूवर गोळी चालवली. दोघामध्ये अंतर नव्हते फारसे. जगदेव बाबूंच्या गळ्यात निदर्शनाच्या वेळी घातलेले हार होते. जगदेवबाबू कोसळल्यावर त्यांना लाठ्यानी पुन्हा बडवण्यात आले.

ज्याने गोळी चालवली तो इन्स्पेक्टर घाबरला. जवळच्या SDO किंवा SDM कोणीतरी त्याला म्हणाला की तू नेत्याला गोळी घातली आहेस, माजी मंत्र्याला गोळी घातली आहेस. आता तुझी धडगत नाही. तो इन्स्पेक्टर घाबरला. इतक्यात पाठून डी. एस. पी. पुढे आला आणि इन्स्पेक्टरची पाठ थोपटून म्हणाला शाबास. तू शूरवीर आहेस. बरोबर नेत्यालाच मारलेस. असेच नेत्यानाच खरे म्हणजे मारायला हवे होते. ही कथा एक इन्स्पेक्टर आपल्या मित्राला गयेच्या आजाद पार्कमध्ये सांगत असताना मी स्वत: माझ्या कानानी ऐकली आहे. कोणाचे राज्य चालू आहे या देशावर ? गप्पा समाजाच्या कल्याणाच्या, गरिबी हटविण्याच्या, आणि वागण्याची ही तऱ्हा.

एका माजी मंत्र्याची ही विल्हेवाट तर सामान्य माणसाची काय अवस्था होणार ? जगदेवबाबूंची पत्नी त्याच दिवशी संध्याकाळी ७ वाजता चौकशी करायला गेली असताना पोलीस स्टेशनात जगदेवबाबूंचा मृतदेह होता. पण त्यांच्या पत्नीला मात्र सांगण्यात आले की जगदेवबाबूंना गयेच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. ती बिचारी तेथे गेली तेव्हा हॉस्पिटलवाले म्हणाले की जगदेवबाबू येथे नाहीत. रातोरात दुसऱ्या मार्गाने जगदेवबाबूंचे प्रेत हलवण्यात आले होते. कशाला ? माजी पोलीस मंत्री रामानंद तिवारींनी उघड आरोप केला आहे की जगदेवबाबूंचा खून करण्याचा पद्धतशीर कट शिजवण्यात आला होता. त्यानुसारच विशिष्ट अधिकाऱ्यांना तेथे नेमण्यात आले होते.

बिहारच्या कांग्रेस सरकारला ते सहज शक्य आहे.

सूरजनारायण सिंग हा बिहारचा ज्येष्ठ नेता. जयप्रकाश नारायण जेव्हा हजारीबाग तुरुंगातून पळाले तेव्हा सूरजबाबू त्यांच्याच बरोबर तुरुंगातून पळाले होते. ५२ पासून ७२ पर्यंत सतत एका मतदार संघातून निवडून येत होते. सर्व बिहार त्यांना मानीत होते, ओळखीत होते.

दिवसाढवळ्या उषा मार्टीनला त्यांच्यावर मारेकरी घालून त्यांचा खून करण्यात आला. एक वर्षापूर्वी खुनाच्या आधी काही तास एका मंत्र्याने खुनाच्या जवळपासच्याच जागेत राहून सगळा कट तयार केला होता, स्वत: त्यावर नीट लक्ष ठेवून तो पार पाडला होता.

कुठे झाले कोणाला शासन ? मिळाले कोण ? दोषी ठरले कोण ?

रक्षकच भक्षक बनल्यावर आणखी वेगळे ते काय व्हायचे ? □

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## लीना

### ये 'मनचली'भी शादी करने चली !

डिंपल, तनुजा, जया, राखी यांच्या पावलावर पाऊल टाकून आता लीना देखील लग्न करणार आहे. अलीकडेच लीनाच्या बाबतीत बोलताना संजीवकुमार म्हणाला होता, 'कुणा निर्मात्याने माझ्याकडे बऱ्यापैकी हिरॉइनची चौकशी केली तर मी लीनाचे नाव सुचवतो.' हिरॉइन्सच्या लग्नामुळे हैराण झालेल्या संजीवकुमार पासूनही लीनाने आपल्या लग्नाचेही गुपितच ठेवले असावे. कारण लीनाचा भावी नवरा सिद्धार्थ बांदोडकर यांच्या सांगण्यावरून असे दिसते की त्या दोघांच्या लग्नाच्या गोष्टी स्वर्गवासी दयानंद बांदोडकर हयात होते, त्यावेळी त्यांनाही लीना–सिद्धार्थच्या लग्नाची कल्पना असावी. एकूण लीनाचे हे लग्नप्रकरण फार जुने आहे.

लीनाने त्याला अत्यंत सावकाशीने आणि सावधगिरीने प्रसिद्धी दिलेली दिसते. जया, तनुजा, राखी या एकेकीने लग्न केले आणि चित्रपट संन्यास घेतला. त्यामुळे चित्रपट धंद्यात एकदम हिरॉइन्सचे दुर्भिक्ष्य पडले. हेमा, रेखा, झीनत या तीन चार हिरॉइन्सबरोबर एक लीना ही जुनी शिल्लक आहे, हे आता निर्मात्यांच्या लक्षात आले होते आणि आताशा तिने संजीवबरोबर ज्या एक दोन चित्रपटात काम केलं होतं ते 'अन्होनी' आणि 'मनचली' हे दोन्ही चित्रपट चालले आणि त्यात लीनाला काम येतं असंही निर्मात्यांना दिसून आलं होतं. त्यामुळे निर्माते तिच्याकडे जाऊ लागले होते. पण, निर्मात्यांना बिचाऱ्यांना काय ठाऊक की ही 'मनचली' गुपचूप लग्न ठरवून बसली आहे. त्यांना ठाऊक नाही, तेच बरं होतं. जे काही करार करायचे तेवढे लीनाने करून टाकले. आता, लोक पुढच्या वर्षीच्याही तारखा मागू लागले तेव्हा तिने आपल्या लग्नाची बातमी पसरवून दिली. म्हणजे निर्मात्यांनो, जरा सबूर. ये मनचली भी लगीन करने चली.'

एकूण लीनाही लग्न करून चालली. आताच कुठे तिचं निर्माते नाव घेऊ लागले होते. हेमा, रेखा, योगिता, झीनत या अभिनेत्रींमध्ये लीनाचाही विचार होऊ लागला होता. नाहीतर यापूर्वी लीनाचा विचार कोणी केला तर हासत. मागे एकदा राजखोसला 'कच्चे धागे'ची कास्ट फिक्स करीत होते. मौशुमीपूर्वी त्यांनी लीनाचे नाव घेतले. ते म्हणाले, 'मन की जीत'मध्ये, तो एक क्षण आहे पहा' राजखोसला लीनाची बाजू घेऊन बोलत होते आणि मी नि. ग. रा. कामत हासत होतो. राजखोसलांना नशा करायची सवय आहे. पण नशा करण्यापूर्वीच त्यांचा काही घोटाळा झाला आहे अशा रीतीने. पण आता मला खास वाटू लागले होते की लीनाची जागा हेमाच्या खालोखाल आहे. ती खुबसुरत तर आहेच. रेखापेक्षाही खुबसुरत आहे. झीनतपेक्षा चांगली अदाकार आहे. सर्वात म्हणजे तिला एक चांगला पोरीचा लाडीक आवाज आहे. 'मनचली'मधल्या 'गम का फसाना' ह्या गाण्यात ती, 'अच्छा जीऽऽ' एवढेच बोलते, ते तिचं बोलणं किशोरच्या गाण्यापेक्षा अधिक आवडतं आपल्याला. 'अन्होनी', 'मनचली' ही अलीकडे तिची गाजलेली पिक्चर्स. एरवी लीनाची पिक्चर्स पडायचीच असाच एक नियम होता. मराठी चित्रपटात अनुपमा आणि हिंदी चित्रपटात लीना. महंमुदची जबरदस्त अदाकारी असलेल्या 'हमजोली' चित्राची नायिका लीना होती म्हणून तेही पडले. पण, महंमुदने 'मैं सुंदर हूं'मध्ये लीना असूनही ते पिक्चर आपल्या अदाकारीच्या जोरावर सावरून धरले होते. 'सास भी कभी बहू थी' हे पिक्चर सावरून धरण्यासाठी ओमप्रकाशलाही फारच धडपड करावी लागली.

मजा अशी की लीना पडद्यावर काही इंप्रेशनच पाडीत नव्हती. ती आली त्यावेळी 'सोलवा साल'की लडकीचे इमेज बबिताने परफेक्ट करून टाकले होते. 'सोलवा साल' की लडकी म्हटली म्हणजे ती कशी

हसेल, कशी उछलकूद करेल, कशी प्यार करेल, मुलगा पसंत पडला म्हणजे कशी लाजेल, वगैरे वगैरे साऱ्या गोष्टी बबिताने परफेक्टली अदाकारीत आणल्या होत्या. त्यावेळी ही खुबसुरत मुलगी निव्वळ जितेंद्र किंवा संजयसारख्या हिरोंना जीभ काढून किंवा आंगठा दाखविण्याची अदाकारी करण्यापलिकडे गेली नव्हती. मजा अशी की तिला प्रथम सुनीलदत्तने ज्या 'मन का मीत' या पिक्चरमध्ये पेश केले होते, त्या पिक्चर्सचे आजही रिव्ह्युज वाचले तरी तुम्ही वाचाल की सुनीलदत्तने जे चार नवे चेहेरे पेश केले आहेत, त्यात अदाकारी फक्त लीनालाच येते आहे असे दिसते.

अखबारवाल्यानी विनोद खन्ना, सोमदत्त हे त्या चित्रपटामधले अदाकार नापास केले होते. पण विनोद खन्नाने आपल्या अदाकारीमधल्या सिन्सिरिटीमध्ये आता पहिल्या पाच अदाकारामध्ये स्थान मिळवले आहे. पण, लीना – 'बबिता' स्टाईलच्या सोलवा सालकी लडकीचा रोल करीत करीत इतकी मागे पडली की आता विनोदच्या इतका पल्ला गाठण्यासाठी तिला इतकी वर्ष वाया घालवावी लागली.

लीना ही एरवी हलक्या फुलक्या कॉमेडीसाठी बरी आहे हे हनीमूनमध्ये प्रथम दिसलं. 'हनीमून'मध्ये ती अनील धवन या ठोंब्याची हिरॉइन बनली होती, आपले लग्नापूर्वीचे प्रेमप्रकरण फुटू नये म्हणून टरकलेली दुल्हन तिने नीटपणे उभी केली होती. लीनाबरोबर जर दुसरे चांगले अदाकार असते तर ही कॉमेडी 'आज की ताजा खबर'पेक्षाही अधिक रंगली असती आणि त्याबरोबर लीनालाही लोकांनी अदाकार मानले असते.

एकूण मद्रासकडचे निर्माते सोडले तर मुंबईतल्या निर्मात्यांना लीनामध्ये काही इंटरेस्ट नव्हता. मद्रासकडच्या घरेलू पिक्चर्समध्ये हिरोबरोबर रोमँटिक सीन्ससाठी एखादी गुड्डी लागायची आणि लीना तशी होती म्हणून तिथले निर्माते तिला अधुनमधून घेत होते. पण मुंबईत हेमा, मुमताझ, शर्मिला, जया, राखी, रेखा यांचेच राज्य होते. मुंबईत काही झालं तरी मद्रासपेक्षा हिरॉइन्सना अधिक चॅलेंजिंग रोल्स मिळत. आर्टिस्टच्या अदाकारीची कसोटी लागे. लीनाचा मुंबईचे निर्माते विचारही करीत नव्हते. त्यामुळे तिची अदाकारी पहाण्याचा योग येत नव्हता.

अर्थात लीना मात्र मुलाखती वगैरे देऊन माझे महेश्वरी मंडळींचे 'चिंगारी' हे चित्र पहा. त्यात तुम्हाला मला मानावेच लागेल असे सांगत होती. पण, ते चित्र अद्याप कुठे लागत नव्हते आणि लीनाकडे कोणीही अदाकार म्हणून पहायला तयार नव्हते.



'अन्होनी'च्या सेटवर दिग्दर्शक रवि टंडन, लीना आणि संजीव

दरम्यान रवी टंडन या मुंबईच्या निर्मात्याने लीनाला भूमिका देण्याचे डोक्यात घेतले. रवी टंडनने जुहूच्या 'हॉटेल इन फोम 'मध्ये आम्हा निवडक चार पत्रकाराना एक पार्टी दिली आणि आपल्या चित्रात सजीवकुमार आणि लीना ही जोडी पेश करीत असून हे एक वेगळ्या धर्तीचे रहस्य चित्र आहे असे सांगितले. सजीवकुमारलाही त्यावेळी वाईट दिवस होते आणि लीनाबद्दल तर सांगायलाच नको. टंडनजी मग 'अन्होनी 'ची कथा सांगू लागले. इतक्यात त्या पार्टीत सुनील दत्त आणि 'रेप फेम ' मनमोहन आले. सुनीलदत्त आपले सिनेकलावताचे पथक बगला देशाला घेऊन गेला होता. त्याने त्या पथकाची माहिती द्यायला सुरुवात केली आणि मनमोहनने (हा गुजराथी आहे!) सरदारजीचे जोक्स सांगून आम्हाला बोअर केले. सहाजिकच आम्ही 'अन्होनी ' विषयी पार विसरून गेलो. सहाजिकच आहे, संजीवकुमार आणि लीनासारखे अदाकार घेऊन आता कसचे टंडनजी पिक्चर काढतात असे वाटले.

पण टंडनजीनी अन्होनी खरोखरच चागले पिक्चर काढले. आपल्या चित्राचा शेवट कुणालाही सांगू नका असे टंडनजीनी सांगितले तरी त्या चित्राच्या रहस्यामध्ये एवढी काही खास मजा नव्हती. आणि संजीव आणि लीना याच्या कामामुळेच हे चित्र पहाण्यात मजा आली. संजीव वेड्याची भूमिका 'खिलौना 'पासून नीटच करीत आला आहे परंतु, त्याहीपेक्षा गुन्ह्याचा गड असलेली तरुण डॉक्टरीण (मानसिक) म्हणून तिने अत्यत जीव ओतून काम केले होते. लीना ही अदाकार असल्याची प्रथमच सर्वांना खात्री पटली होती. त्यानंतर 'मनचली. ' 'मनचली 'ची भूमिका होती लीनाची. पण पटकथालेखक ग. रा. कामत आणि दिग्दर्शक राजानवाथे यांनी हे चित्र असे पेश केले की सजीवकुमारलाच त्यात वाव मिळावा. या कथेवरील स्वर्गवासी गुरुदत्त याचे 'मि. अँड मिसेस फिफ्टी-फाईव्ह ' आठवते आणि त्यामध्ये वाव मिळाल्यामुळे मधुबालाने काय जबरदस्त अदाकारी केली हेही लक्षात येते. तर 'मनचली 'मध्ये आपली सजीवकुमारपुढे दुय्यम भूमिका आहे हे समजूनही लीनाने कामाची चागली समज दाखवली आणि संजीवला ते पिक्चर खाऊ दिले. याचसाठी मला वाटत सजीव तिला दुसऱ्याचं ऐकणारी आणि चांगले सहकार्य देणारी अदाकारा म्हणतो.

लीना ही अदाकारा आहे म्हणून आता फिल्मइडस्ट्रीमध्ये तिची इज्जत होऊ लागली होती. पण, ती चागले सहकार्य देते ही गोष्ट फक्त सजीवकुमारच बोलतो. विजय आनंदने तिला 'चोर चोर 'मध्ये घेतले आणि आपण इतकी 'मनचली ' अदाकारा दुसरी पाहिली नाही असे तो सागू लागला. विजय आनद हा एक असा माणूस आहे की ज्या माणसाशी त्याचं जमत नाही, त्या माणसाच नाव घेतल्यावरही त्याचा मस्तकशूल उठतो. लीना त्याच्याशी कशीही वागलेली असो, तिने 'चोर चोर 'मध्ये चागली भूमिका केली आहे, असे ऐकतो (पत्रकाराना त्याने तो दाखवला नाही) हेही काही कमी नव्हते.

एकूणच लीना मागे पडण्यामागे ती सहकार्य देत नाही, असा फिल्म इडस्ट्रीमध्ये फार मोठा गैरसमज होता. लीना एरवी खुबसुरत, बाहुलीसारखी मुलगी ती डोक्याने कठीण असण्याचा सभव आहेच. नाझिमा नावाच्या नटीचे आणि तिचे बिनसले होते. त्यामुळेही विचारी लीना बदनाम झाली होती. एकूण सिने इडस्ट्रीत ती नेहेमी एक अडचणीची बाब होऊन बसली. तिने एखाद्या सिनेमात काम करावे आणि तिच्या भावाने पत्रकाराना गाठून 'मी लीनाचा भाऊ. लीनाला चागले म्हणा ' असे सांगावे असाही सर्रास प्रकार चालला होता. त्यामुळे लीनाभोवती हे तिचे गणगोत सापासारखे वेटोळे घालून बसले आहेत, तर 'कशाला या बाईच्या नादाला लागा ' असेच कुणालाही होऊन जाई.

तर यामुळेच एरवी लीना लग्न करून आपल्या नवऱ्याचा ससार करायला गेली असती तर कोणी काही म्हटले नसते. ती अनेक अभिनेत्रीना सिनिअर असून इतकी मागे पडली होती, यापुढे तिने फिल्म इडस्ट्रीमध्ये आपली लुडबुड बद करावी नी कुणाशी तरी लग्न करून मोकळे व्हावे असेच कोणीही म्हटले असते. पण, आज फिल्म इडस्ट्रीमध्ये हिरॉइन्सचा तुटवडा पडला आणि लीना ही अदाकार म्हणून काही वाईट नाही, हे सर्वांनी मानलय तेव्हाच ही मनचली आपले लग्न करायला निघाली आहे. त्यावेळी एकच वाटत– 'अखेर लीनाही सटकली... हा लग्नाचा रोग काय भयकर फैलावलाय फिल्म इडस्ट्रीत!' ◻

## मधुचंदा धी ग्रेट

'सारा आकाश 'मधली खुबसुरत पण सोशिक बहु म्हणून मधुचदा आपल्याला आवडली होती. आब्बास साहेबाच्या 'एक बुद पानी ' आणि नरेंद्रबेदीच्या 'खोटे सिक्के ' या पिक्चरमध्ये तिने असल्याच भूमिका केल्या होत्या.

आपल्याला मग वाटू लागले या अदाकाराच काही खर नाही. हिची मीनाकुमारी वगैरे होण्याची काहीतरी चालू आयडीया दिसते पण, हिच्या अदाकारीमुळे कुणाच्याही डोळ्याला पाणी येणार नाही. डायलॉग्ज बाबतीत तर काही विचारूच नका.

पण पर्वा सँडो चिनप्पा देवर याचा शुभदिन पाहिला नी या बाईला आपण एकदम मानले. देवर साहेबाचे पिक्चर म्हणजे काहीतरी जनावराचा खेळ असतोच. 'शुभदिन 'मध्ये त्यानी त्यातील जनावराबरोबर काम करणाऱ्या अदाकाराचा शोध केला. त्यात काम असे होते की दुल्हनचा होश गेला आहे. आणि तिला होषमध्ये आणण्यासाठी नागदेवता तिथे येते, तिच्या अंगावर चढून ओठाचे चुबन घेते. नाकाला, कपाळाला स्पर्श करते. अर्थात ही नागदेवता बडल नसून खरा नाग आहे. हा प्रसग ऐकताच म्हणे मी मी म्हणणाऱ्या अदाकारा मागे फिरायच्या. हो. नागाशी खेळ आहे. न जाणो जिवावर बेतले तर. मागे 'जान्वर और इन्सान 'मध्ये राखीच्या जिवावर असेच बेतले होते. राखीच्या मागे वाघ लागलेला आणि राखी पाण्यात उडी मारते आणि वाघ मग मागे फिरतो असा प्रसग. पण वाघाला समोर राखी दिसताच कसचे भान रहाते, त्याने देखील राखीच्या मागोमाग पाण्यात उडी मारली नी मग राखी अशी काही टरकली की बोलायची सोय नाही. दोन दिवसानी तिला म्हैसूरच्या जगलामध्ये भेटलो तर तिच्या तोडी तोच विषय. आणि पुढच्या शॉटमध्ये वाघ दिसला रे दिसला की ती वाघाचा ट्रेनर जागेवर आहे की नाही हे प्रथम बघायची.

तर नागामुळे जिवावरचा प्रसंग. कोठची अदाकारा तो आपल्यावर ओढून घेईल. पण मधुचदा तयार झाली. तो प्रसग पहाताना आपला तर होश उडाला होता. एकदम मानले या अदाकाराला. ही तर मीनाकुमारीपेक्षाही ज्यादा निघाली. ■ ■

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC - 68


बॉम्बे बुक डेपो संचालित

# बॉम्बे बुक क्लब

२१७, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई-४००००४

दरमहा केवळ १० रुपये भरून वर्षाकाठी १३० रुपयांची निवडक पुस्तके आमच्या खर्चाने तुमच्या दारी वर्षातून तीन हप्त्यांत. ■ सलामीच्या वर्गणी सोबत एक भेट पुस्तक 'विनामूल्य' ■ शिवाय वर्षअखेरीस आणखी एक भेट पुस्तक 'विनामूल्य' आणि 'पुस्तक पंढरी' मासिक (वा. वर्गणी रु. ५) वर्षभर घरबसल्या पुस्तकांची निवड करण्यासाठी. ■ ५०० हून अधिक दर्जेदार, विविध विषयातील ग्रंथांतून निवड.

| तुम्ही हे द्या | आम्ही हे देऊ |
|---|---|
| रु. २ प्रवेश फी + रु. १० ( पहिला हप्ता ) | ■ सभासद कार्ड, पुस्तकांची सूची, १ भेट पुस्तक, मासिक 'पुस्तक पंढरी'चा अंक |
| रु. १० दरमहा ( तीन महिने ) | ■ रु. चाळीसची पुस्तके ( तुमच्या निवडीनुसार ); पाठवणावळ माफ |
| रु. १० दरमहा ( चार महिने ) | ■ रु. चाळीसची पुस्तके ( तुमच्या निवडीनुसार ); पाठवणावळ माफ |
| रु. १० दरमहा ( चार महिने ) | ■ रु. पन्नासची पुस्तके (तुमच्या निवडीनुसार), शिवाय एक भेट-पुस्तक ( तुमच्या निवडीनुसार ३ पैकी १ ); पुढील वर्षाची प्रवेश फी माफ |
| आपला विश्वास | ■ आमची कृतज्ञता |

## म्हणजेच थोडक्यात

वरील योजनेनुसार सभासदांस रु. १२० रु. ऐवजी किमान रु. १६० किंमतीचा लाभ होईल. [ पुस्तकांची किंमत : रु. १३० + भेट पुस्तके अंदाजे रु. १० + 'पुस्तक पंढरी' वर्गणी रु. ५ + पाठवणावळ अंदाजे रु. : १५ — म्हणजे एकूण संपूर्ण लाभ रु. १६० ]

**विनामूल्य**

**रु. ४०/- वाचवा**

**माझ्या घरी माझी पुस्तके योजनेत भाग घ्या.**

**अधिक माहितीसाठी पत्र पाठवा !**

**सलामीची भेट पुस्तके :**

- चक्र — जयवंत दळवी
- कडू आणि गोड — गंगाधर गाडगीळ
- ययाति आणि देवयानी — वि. वा. शिरवाडकर

कार्यवाह, बॉम्बे बुक क्लब, मुंबई ४००००४

मी ………… महिन्यापासून सभासद होऊ इच्छितो. सोबत मासिक वर्गणी रु. १० व प्रवेश फी रु. २ पाठवीत आहे. स्वीकार व्हावा.

भेट पुस्तक ………… पाठवावे.

नाव व पत्ता …………………………………

……………………………………………

● दिवाळीपर्यंत सभासदत्व नोंदविणाऱ्यास प्रवेश फी माफ


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**